
योजना

□ वर्ष २३ : अंक ७ □ फेबुवारी १९९६ □ मूल्य ५/- रुपये



विकास डायरी

ऊस उत्पादकांना बोनस

भारत जगातील सर्वात जास्त ऊस उत्पादक देश आहे. १९९४-९५ मध्ये आपण १४६ लाख टन साखरेचे उत्पादन करून एक विक्रम केला. ५ लाख टन साखर निर्यात करून भारताने आंतरराष्ट्रीय मार्केटमध्ये मोठे स्थान मिळवले आहे.

१९९५-९६ सालामध्ये कारखान्याला ऊस पुरवणाऱ्या शेतकऱ्यांना प्रतिटन ७५० ग्रॅम साखर स्वस्त भावात कारखान्यांनी द्यावी असा आदेश अन्न मंत्रालयाने काढला आहे. १९९४-९५ च्या हंगामात चांगले उत्पादन झाल्याने हा निर्णय घेतला. शेतकऱ्यांना अशा कारणासाठी दिलेल्या साखरेचा कोटा कारखान्याकडून येणे असलेल्या लेव्हीमधून वळता करावा.

या योजनेखाली प्रत्येक शेतकऱ्याने किती ऊस पुरवला व त्यासाठी किती लेव्ही साखर त्यांना दिली याचा रिपोर्ट अन्नमंत्रालयाकडे पाठवण्यास प्रत्येक कारखान्यास सांगितले आहे.

तांदूळाच्या निर्यातीत कधी नव्हती इतकी वाढ

१९९५-९६ मध्ये तांदूळाची निर्यात २५ हजार मेट्रिक टन इतकी होईल असा अंदाज आहे. गेल्यावर्षी फक्त २००० मेट्रिक टन तांदूळाची निर्यात झाली होती. यावर्षीची निर्यात फार मोठी आहे. अन्न महामंडळाने एकूण २५००० टन उत्कृष्ट प्रतीचा तांदूळ निर्यात केला आहे. मार्च ९६ पर्यंत आणखी १० लाख टन तांदूळ विक्रीस काढला जाईल. मध्यवर्ती साठ्यात धान्य जास्त साठणार असल्याने यावर्षीही धान्याची खुली विक्री करण्याचे धोरण केंद्रीय सरकार राबवेल.

पावसाळ्याआधी साठा करण्यासाठी काश्मीर खोऱ्यात आणि ईशान्य राज्यात अन्नधान्याची फार मोठी वहातूक करून योग्य तो साठा करून ठेवला गेला.

१९९५-९६ मध्ये ५५ लाख टन गहू आणि १५ लाख टन तांदूळ विक्रीसाठी काढण्याचे अधिकार अन्न महामंडळाला देण्यात आलेले आहेत. खुल्या बाजारात विक्री झालेले धान्याचे आंकडे खालीलप्रमाणे :—

वर्ष	राशी (लाख टन)	
	गहू	तांदूळ
१९९३-९४	२८.५६	०.१७
१९९४-९५	५०.२९	४.५४
१९९५-९६ (नोव्हें. ९५ पर्यंत)	३१.०३	११.१३

योजना

नियोजन आणि विकास समर्पित

Vol. XXIII
No. VII

☐ वर्ष २३ ☐ ☐ अंक ७ ☐ ☐ फेब्रुवारी १९९६ ☐

मुख्य संपादक
देवेन्द्र भारद्वाज

मराठी आवृत्ती संपादक
मोनीदीपा मुखर्जी

नियोजन मंडळाच्या वतीने आसामी, उर्दू, इंग्रजी, कन्नड, गुजराती, तामिळ, तेलगू, पंजाबी, बंगाली, मल्याळम्, मराठी, हिंदी व उडिया भाषांतून प्रकाशित.

योजना हे केंद्र सरकारच्या व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिद्ध होत असले तरी देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. योजनेत प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.

अं त रं ग

☐ **संपादकीय** २

☐ **ब्रिटीश राजसत्तेवर शेवटचा वर्मी प्रहार करणारा हिंदी क्रांतीवीर : नेताजी सुभाषचंद्र बोस** ३
— वि. श्री. जोशी

☐ **मोरारजी देसाईंच्या जन्मशताब्दी निमित्तने** ९
– के. सी. जोगळेकर

☐ **केंद्र राज्य वित्तीय संबंध आणि दहावा वित्त आयोग-उपेक्षा आणि अपेक्षा** ११
– प्रा. डॉ. शिवाजी पाटील

☐ **महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी दुष्टचक्राच्या विळख्यात** १५
— डॉ. एम. एन. शिंदे

☐ **आंतरराष्ट्रीय कृषि विकास निधी पुरस्कृत महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा प्रकल्प** २५
– सुनील डबीर

☐ **६९वे मराठी साहित्य संमेलन-एक आढावा** २८
— ग. ल. कर्वे

☐ **पुस्तक परिक्षण : मूल्याधिष्ठीत राजकारणाचे प्रवर्तक भारतसेवक गोपाळ कृष्ण गोखले** ३१
— ज. शं. आपटे

योजना वर्गणीचे दर :
वार्षिक : ५० रु.
किरकोळ किंमत ५ रु.

योजनेसाठी लेख, वर्गणी, जाहिराती इ. साठी पत्रव्यवहार पत्ता :
योजना मासिक कार्यालय
३८, युसुफ बिल्डिंग, ४था मजला,
वीर नरिमन मार्ग, हुतात्मा चौक,
मुंबई - ४०० ००२.
दूरध्वनी : २०४ ०४ ६१

संपादकीय

नेताजींची जन्मशताब्दी



जन्म : २३ जानेवारी १८९७ अपघात : १८ ऑगस्ट १९४५

भारताच्या राष्ट्रीय पुढाऱ्यांचे नेताजी सुभाष चंद्र बोस हे वेगळेच उठून दिसणारे नेता आहेत. त्यांच्या जन्मशताब्दीच्या वर्षात त्यांच्या मृत्यूला ५०वर्षे उलटून गेल्यावरही त्यांची आठवण येताच त्यांच्या लाखो चाहत्यांचा आजही उर भरून येतो. सुभाषबाबूंच्या जीवनाविषयी विचार करताना आजही लोक भावनाविवश होतात.

काँग्रेसमधल्या त्यांच्या इतर पुढाऱ्यांपेक्षा ते अनेक दृष्ट्या वेगळे होते. म. गांधींनी पाठिंबा दिलेल्या कांग्रेस अध्यक्षपदाच्या उमेदवारास विरोध करण्याचे अतुलनीय धैर्य सुभाषबाबूंनी दाखवले. आणि काँग्रेस अध्यक्षपदासाठी गांधींच्या उमेदवारास हार पत्करावी लागली. ज्या तऱ्हेने सुभाषबाबूंना दुसऱ्या वेळी खाली खेचले गेले. त्यावरून असे दिसले की महात्मा सुद्धा हाडामासाचेच होते आणि आपल्याला एक तरूण पुढारी विरोध करीत आहे हे गांधीजी सहन करू शकले नाहीत.

सुभाषबाबू स्वातंत्र्यप्राप्तीसाठी हिंसेचा अवलंब करावा अशा विचारांच्या बंगाली जहाल हुतात्म्यांच्या मालिकेतले होते. अहिंसा, असहकार या मार्गाने जनतेत जागृती करून ब्रिटिश साम्राज्यशाही उलथवून टाकावी ही कल्पना त्यांच्या राष्ट्रीय विचारांच्या लोकांना पटेना; यामुळे स्वातंत्र्यप्राप्ती लवकर होणार नाही असे ह्या जहाल पुढाऱ्यांना वाटत होते. म्हणून स्वत:च्या मताने जाण्याचे सुभाषबाबूंनी ठरवले आणि ते जर्मनीला गेले.

त्यांची ही कृती दुर्दैवाने चुकीची होती. कारण नाझींनी आणि जपानी लोकांनी भारताला स्वातंत्र्य दिले नसते. ही मोठी चूक. करूनही हे मान्य केले पाहिजे की त्या आधी इतिहासात न घडलेली घटना त्यांनी घडवून आणल्या त्या भारताला स्वातंत्र्य मिळावे या आपल्या ध्येयप्राप्तीसाठीच.

भारतीय युद्धकैद्यांमधून इंडियन नॅशनल आर्मीची उभारणी करून त्यांनी दाखवून दिले की ब्रिटिश सरकार आपल्या मुख्य आधारावर आता विसंबून राहू शकत नव्हते. हे सुभाषबाबूंचे कार्य, त्याचप्रमाणे भारतातली 'चलेजाव चळवळ', महायुद्धात भारतीय सैनिकांनी बजावलेली कामगिरी, रॉयल भारतीय नौदलांतले बंड ब्रिटिशांना समजून चुकले की आता राज्य पुढे चालवणे शक्य नव्हते.

ही दुर्दैवाची गोष्ट आहे की नेताजींच्या मृत्युबाबतीत अजूनही वाद आहे. आज त्यांची जन्मशताब्दी साजरी होताना तरी त्यांच्या मृत्युबाबतचे वाद मिटवले पाहिजेत. ज्यांचे अजूनही असे मत आहे की १९४५ साली विमान अपघातात त्यांचा मृत्यु झाला नाही त्यांनी त्या अपघातातून नेताजी बचावले असे पुरावे सादर केले पाहिजेत. आता असं कुणीही म्हणू शकणार नाही की आज शंभर वर्षानंतर नेताजी जिवंत आहेत.

सुभाषबाबू उजव्या किंवा डाव्या असा विचार प्रणालीत बसत नाहीत. त्यांनी स्थापन केलेला पक्ष फॉरवर्ड ब्लॉक डाव्या विचारांचा होता. पण सुभाषबाबूंनी जपानी लोकांशी सहकार्य केले. त्याहीपेक्षा नेताजी मोठे राष्ट्रीय पुढारी होते. त्यांच्या भारतीय राष्ट्रीय आर्मी प्रमाणेच त्यांची मानवंदना 'जयहिंद' ही भारतीय मानवंदना झाली. 'जन गण मन' आणि 'वंदे मातरम्' आणि 'जयहिंद' ही तीन भारताचे घोषवाक्ये झाली आहेत.

म्हणून जोपर्यंत आपण 'जयहिंद' म्हणून भारतमातेला मानवंदना देतो तोपर्यंत सुभाषबाबूंचे नाव स्मरणात राहील.

□□

ब्रिटिश राजसत्तेवर शेवटचा वर्मी प्रहार करणारा हिंदी क्रांतीवीर

नेताजी सुभाषचंद्र बोस

● वि. श्री. जोशी

"तिथे लांब अंतरावर, त्या नदीपलीकडे, त्या अरण्यापलिकडे, त्या टेकड्यांपलीकडे आपली ध्येयभूमी वसत आहे ! ज्या भूमीमध्ये आपण जन्मलो, ती भूमी ! ऐका ! हिंदुस्थान तुम्हाला साद घालीत आहे, रक्त रक्ताला बोलावत आहे. उठा ! तुमची शस्त्रे उचला. शत्रूच्या फळीमधून आपण आपला मार्ग कापीत जाऊ किंवा परमेश्वराची तशी इच्छाच असेल, तर हुतात्म्याचे मरण पत्करू ! आणि आपल्या अंतिम निद्रेमध्येही आपल्या सेनेला दिल्लीस नेणाऱ्या रस्त्याचेच चुंबन घेऊ ! दिल्लीचा रस्ताच स्वातंत्र्याचा रस्ता आहे ! चलो दिल्ली !"

(नेताजी सुभाषचंद्र बोस सप्टेंबर १९४४ मधील सिंगापूरला केलेले भाषण.)

ब्रिटीश सरकारविरुध्द हिंदुस्थानने केलेल्या स्वातंत्र्य लढ्यात अगणित वीरपुरुषांनी क्रांतीचा मार्ग चोखाळला, पण त्यात परकीय सत्तेवर शेवटचा वर्मी प्रहार करुन नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी केलेला पराक्रम अद्वितीय नि ओजस्वी होता.

सुभाषचंद्रांचा जन्म वंगभूमीच्या एका प्राचीन आणि प्रख्यात कुळात २३ जानेवारी १८९७ ला झाला. ते घराणे माहीनगरचे बोस म्हणून प्रख्यात होते. ते मूळचे कलकत्त्यापासून १४ मैलावरील दक्षिणेस असलेल्या शहरी गावचे., सुभाषचंद्रांच्या वडिलांचे नाव जानकीनाथ बोस होते. त्यांच्या घरात कमालीची गरीबी होती. प्राथमिक शिक्षण जवळच्या अँग्लोइंडियन शाळेत झाल्यावर त्यांच्या बंधूंनी त्यांना ते शिक्षक असलेल्या कटकच्या कॉलेजिएट स्कूलमध्ये पुढील शिक्षणासाठी नेले. कलकत्त्याच्या सेंटझेवियर्स व स्कॉटिश चर्च कॉलेजात काही काल शिक्षण घेतल्यावर कटकच्या रॉवेनशॉ कॉलेजमधून बी. ए. झाले. पुढे कलकत्त्याच्या विधिमहाविद्यालयातून ते विधीशाखेची पदवी घेऊन १८८५



पासून वकीली करु लागले. पुढे १०-१५ वर्षात त्या धंद्यात त्यांनी चांगला पैसा कमावला. १९५० मधे सरकारने त्यांना पब्लिक प्रॉसिक्युटर म्हणून नियुक्त केले. पुढे १९१२ मध्ये त्यांची लेजिस्लेटिव्ह कौंसिलचे सदस्य म्हणूनही नेमणूक झाली. त्यांना 'रॉयबहादुर' ही पदवी ही दिली. पण पुढे एका प्रकरणात जिल्हा मॅजेस्ट्रिटशी मतभेद झाला आणि त्यांनी सरकारी नोकरीचे त्यागपत्र दिले.

या आधीच प्रभावती देवींशी त्यांचा विवाह झाला होता. त्या हतकोळा येथील दत्त घराण्यातील होत्या. त्या अतिशय धार्मिक वृत्तींच्या व प्रेमळ होत्या. जानकीनाथांना ८ मुलगे व ६ मुली झाल्या. त्यातील पाच भावानंतर सुभाषचंद्रांचा जन्म झाला. त्यांना तीन वडील बहिणी होत्या. सुभाषचंद्रांचे वडिल बंधूपैकी शरदचंद्रांशी अधिक रहस्य असे. ते शरदचंद्रांना 'मेजदादा' म्हणत नि त्यांची मुले सुभाषचंद्रांना 'रंगाकाळ बाबू' म्हणत. जानकीनाथ या मोठ्या कुटुंबात त्यावेळच्या रिवाजाप्रमाणे मुलांशी फार मिळून मिसळून वागत नसत, कारण त्यांचा वकिलीचा व्यापहि मोठा होता. पण मुलांच्या शिक्षणाकडे व सद्वर्तनाकडे त्या चे चांगले लक्ष असे योग्यवेळी सुभाषचंद्रांना बॅप्टिस्ट मिशनने चालवलेला शाळेत पाठविले. तेथे ते घोड्याच्या गाडीतून जात. त्यांची बुद्धीमत्ता प्रथम श्रेणीची होती वयाच्या १३ व्या वर्षीच ते मॅट्रिक्युलेटची परिक्षा उत्तीर्ण झाले व तीन विषयात दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. शाळेत व कॉलेजात असतानाच काही काळ त्यांना अध्यात्मिक विचारांनी ग्रासले. ते नदीकाठी किंवा टेकडीवर जाऊन बसत आणि या जगाच्या अंतिम उद्दीष्टांचा विचार करीत बसत. गुरु वाचून कोणालाही अध्यात्मिक यश साधता येत नाही. असे तत्ववेत्त्यांनी प्रतिपादले आहे; ते मनात धरुन ते गुरुच्या शोधातही बरीच भटकंती करुन आले. त्यांनी विवेकानंदांचे ग्रंथ सूक्ष्मपणे वाचून काढले आणि रामकृष्ण आश्रमातही काही काळ राहिले परंतु त्यांना काही समाधान लाभले नाही मग ते ऐहिक जगाकडे वळले.

एक युवक चळवळ्या कटकला आला. त्याच्या जहाल खटपटीत ते रस घेऊ लागले. त्यांचा हा दिनक्रम पाहूनच वडिलांनी त्यांना कलकत्त्यासच कॉलेज शिक्षणासाठी पाठविले होते. तेथे प्रेसिडेन्सी कॉलेजात असतानाच त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारे ओअॅटन प्रकरण घडले होते. एफ्. सी. ओअॅटन १९१० मधे प्राध्यापक म्हणून आले होते. प्रख्यात भाषा कोविद सुनितीकुमार चटर्जी त्यांचेच विद्यार्थी होते. पण पुढे हिंदुस्थानातील अरेरावी अँग्लो इंडियनांचे वारे त्यांच्या अंगी शिरले नि त्या उन्मादात त्यांनी उद्गार काढले की ब्रिटिश लोक हिंदी लोकांवर राज्य करीत आहेत कारण नैतिक दृष्ट्या ते उच्च नि अधिक वरिष्ठ पातळीचे आहेत, नि हिंदी विद्यार्थ्यांनी हे मान्य करून त्याची जाणीव ठेवली तर बरेच अपसमज दूर होतील.

त्यांच्या या मनोवृत्तीचा प्रत्यय येताच त्यांच्या कॉलेजातील हिंदी विद्यार्थ्यांत नि त्यांच्यात चकमकी उडू लागल्या नि हिंदी विद्यार्थ्यांनी कॉलेजच्या आवारात त्यांच्यावर हल्लाच चढवला नि त्यांना काही रट्टे लगावले. त्यात अर्थात सुभाषचंद्र बोसही होतेच. या घटनेने सर्वत्र प्रचंड खळबळ उडाली. कॉलेच्या प्राचार्यांनी तर प्रथमिक चौकशीत सुभाषचंद्रांना म्हटले, "you are the most troublesome man in the College." (कॉलेजातील तू सर्वात त्रासदायक विद्यार्थी आहेस.") त्यांना या अपराधासाठी कॉलेजातून काढूनच टाकण्यात आले. (रस्टिकेट करण्यात आले.) मग ते कटकला परत गेले. १/१ ॥ वर्ष तिथेच होते. पुढे अशुतोष मुखर्जी यांच्या मध्यस्थीने १९१७ मध्ये त्यांना स्कॉटिश चर्च कॉलेजात परत प्रवेश मिळाला. त्याच कॉलेजमधून ते फिलॉसफी विषय घेऊन बी. ए. ऑनर्ससाठी अभ्यास करू लागले.

त्याचवेळी पहिल्या महायुद्धात ब्रिटिशांना सैनिकांची आवश्यकता भासत असल्यामुळे त्यांनी इंडियन टेरिटोरियल फोर्स आणि युनिव्हर्सिटी इन्फन्ट्री ही सेना उभारण्यात आली. ४९ वे बंगाली पथकही संघटित करण्यात आले. हिंदु तरुणांनाही सेना द्वारे उघडी होताच सुभाषचंद्रांनी सेना प्रवेशासाठी प्रयत्न केले, आणि एक युनिव्हर्सिटी पथक सुरु होताच त्यांनी त्यांत प्रवेश मिळवला नि सैनिक शिक्षण घेतले.

यावेळी त्यांनी बी.ए. च्या शेवटच्या वर्षात जोरात अभ्यास केला आणि १९१७ मध्ये प्रथम वर्गात, दुसऱ्या क्रमांकाने बी. ए. उत्तीर्ण झाले.

जानकीनाथांनी कलकत्त्यासही ३८/२ एल्जिन रोड येथे कुटुंबियांसाठी एक घर बांधले होते, नि शरदचंद्र बोस इ. तेथेच राहात असत. त्याच ठिकाणी या काळात सुभाषचंद्र रहात होते.

सुभाषचंद्रांचा आयुष्याक्रम साधा-

सुधा नाही नि ते क्रांतिकारक प्रपंचात पडण्याचा संभव आहे, हे लक्षात आल्यामुळे. त्यांचे बी. ए. च्या परिक्षेतील प्रथम वर्गाचे यश पाहून, जानकीनाथांच्या मनात त्यांना हिंदुस्थानातून बाहेर काढण्याचा विचार आला. त्यांनी तसे शरदचंद्रांना सुचविले. सुभाषचंद्रांचे शरदचंद्रांशी चांगलेच रहस्य होते. तेव्हा त्यांच्या प्रस्तावाच्याच अनुरोधाने शरदचंद्रांनी तू आय. सी. एस. परिक्षेसाठी विलायतेलाच जातोस का ? म्हणून सुभाषचंद्रांना विचारले. त्यांची सूचना मान्य होऊन १९१९ च्या शेवटी सुभाषचंद्र त्या परिक्षेसाठी विलायतेला गेले. केवळ नऊ महिनेच त्या परीक्षेसाठी असताना केंब्रिज विद्यापीठाचा मानसशास्त्र व नीतिशास्त्र हे विषय घेऊन त्यांचा अभ्यासक्रम संपवून त्या परीक्षेला बसले नि चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

यावेळीही त्यांचा इंग्रजाविषयींचा तिरस्कार लोपला नव्हताच त्याचा अविष्कार करताना ते उद्‌गारले, "गोऱ्या माणसाने माझे बूट पॉलिश करताना मी पाहिले तेव्हा मला फार आनंद झाला." पण ब्रिटिश सरकारची नोकरी करण्याचा त्यांना तिटकाराच होता त्यांनी त्या नोकरीवरील पदावर रुजू होण्यापूर्वीच आपले आय. सी. एस्. परीक्षेचे त्यागपत्र भारतमंत्री मॉंटेग्स् यांच्याकडे पाठवून दिले.

देशसेवेतच आयुष्य घालविण्याचा निश्चय करून १६ जुलै १९२१ ला ते हिंदुस्थानात परतले. त्याच दिवशी मुंबईत मणिभवनात असलेल्या गांधीजींची त्यांनी भेट घेतली. पण ते स्वातंत्र्यासाठी करणार असलेल्या आंदोलनाविषयींच्या त्यांच्या विचारांनी सुभाषचंद्रांचे मुळीच समाधान झाले



सुभाष चंद्राच्या मातोश्री प्रभावती देवी आणि ६ वर्षांचा सुभाष.

नाही. ते कलकत्त्यास गेले, तेव्हा बॅ. चित्तरंजन दास यांच्या चळवळीच्या विचारात त्यांना योग्य मार्ग सापडला आणि ते चित्तरंजन दास यांचे अनुयायी बनले. त्यांच्या सांगण्यावरून ते कलकत्त्याच्या राष्ट्रीय विद्यालयाचे प्राचार्य झाले. लौकरच होणाऱ्या इंग्लंडच्या राजाच्या आगमन प्रसंगी त्यांनी तेथे संपूर्ण हरताळ पाडण्याची चळवळ उभारली तेव्हा सरकारने त्यांना अटक केली नि त्यांना ६ महिने सश्रम कारावासाची पहिली शिक्षा ठोठावण्यात आली.

पुढे बॅ. दास कलकत्त्याचे नगराध्यक्ष म्हणून निवडून आले नि त्यांनी सुभाषचंद्रांची महापालिकेचे मुख्य कार्यकारी प्रमुख (चीफ एक्झिक्युटिव्ह) म्हणून रु. १५०० वेतनावर नियुक्ती केली. त्याना त्यांनी इंग्रज धार्जिण्या कारभार बंद केला. राष्ट्रीय वृत्तीच्या पुढाऱ्यांना मानपत्र देणे सुरु केले. प्राथमिक शिक्षण नि:शुल्क केले. आपले वेतनही ते गोरगरिबांना सहाय्य देण्यात व्यतीत करीत.

त्यांच्या जहाल देशभक्तीची चळवळ सरकारच्या डोळ्यात भरली. क्रांतिकारकांची जी प्रकरणे पेटत त्यांच्यामागे सुभाषचंद्रांचीच प्रेरणा आहे या निश्चितीने २४ ऑक्टोबर १९२४ ला मग संशयावरून, सरकारने एका आदेशाने त्यांना अटक केली. पुढे २५ जानेवारी १९२५ ला तर त्यांना सीमापार करण्यासाठी मंडालेच्या तुरुंगात नेऊन ठेवले.

तेथील दु:सह तुरुंगात नि हवामानात त्यांना लोकमान्यांचा तेथील कारावास आठवला नि ते उद्‌गारले "या परिस्थितीत लोकमान्यांनी ६ प्रदीर्घ वर्षे कशी काढली असतील कोण जाणे !" त्या कारावासाने त्यांचीही प्रकृती ढासळली नि त्या वर्तमानाने त्यांच्या मुक्ततेसाठी जनतेने विराट आंदोलने सुरु केली. इतके की सरकारला शेवटी २६ मे १९२७ ला त्यांची सुटका करावी लागली.

पुढील वर्षी १९२८ मध्ये महाराष्ट्र प्रांतिक परिषदेचे अध्यक्षपद त्यांना

देण्यात आले. त्या नात्याने केलेल्या भाषणात त्यांनी देशाच्या संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयाचीच घोषणा केली.

स्वातंत्र्याच्या ध्येयाची घोषणा करण्यास कांकू करणाऱ्या गांधीजींच्या प्रतिपादनाविरुद्ध पुढील वर्षे सुभाषचंद्रांनी झोड उठविली. १९२९ च्या काँग्रेस अधिवेशनात शेवटी गांधीजींसह सर्व पुढाऱ्यांनी ते ध्येय मान्य केले, पण पुढे १९३० च्या निर्बंध-भंगाच्या चळवळीमध्ये कारावासानंतर गांधी - आयर्विन करारास मान्यता देण्याचा ठराव १९३१ मध्ये कराची काँग्रेसमधे मान्य झाला. पण एक निराळी परिषद घेऊन सुभाषचंद्रांनी त्याच्या विरुद्धही झोड उठवली नि त्याचा धिक्कार केला. १९३० मध्ये ते स्वत:च कलकत्त्याचे नगराध्यक्ष म्हणून निवडून आले होते. १९३१ मध्ये सविनय कायदेभंगाचे आंदोलन मागे घेण्याच्या गांधीजींच्या पवित्र्याविरुद्ध त्यांनी तीव्र मोहीम उघडली. २ जानेवारी १९३२ ला त्यांना सरकारने शिवणी तुरुंगात पाठविले. तेथे त्यांची प्रकृती अत्यवस्थ झाली तेव्हा १९३३ मधे सरकारला जनतेच्या रेट्यामुळे त्यांची सुटका करावी लागली. सुटका होताच १९३३ मध्ये प्रकृति सुधारण्यासाठी ते युरोपात गेले. जेथे त्याच कारणासाठी गेलेल्या विठ्ठलभाई पटेल यांच्या जोडीने गांधीजींच्या चळवळीमागे घेण्याच्या गांधीजींच्या लहरी धोरणाविरुद्ध प्रखर विरोधी प्रचार केला. नि घोषणा केली की, "राजकीय पुढारी म्हणून गांधीजी अपेशी ठरले आहेत." ते म्हणाले, "If the Delhi Pact was a blunder, the surrender of 1933 was a calamity of the First magnitude." (दिल्ली समझोता गांधी आयर्विन पॅक्ट जर घोडचूक असली, तर १९३३ मधील शरणागती ही प्रथम श्रेणीची आपत्ती होती.)

युरोपात त्यांनी वेळोवेळी संधी मिळताच हिंदुस्थानातील ब्रिटिश सत्तेविरुद्ध कडवा प्रचार केला आणि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा जयजयकार केला. इतिहासात आंतरराष्ट्रीय क्षेत्रात सावरकरांनंतर त्यांनीच अशी जाणीवपूर्वक आघाडी उघडली. थोड्याच दिवसात विठ्ठलभाई पटेलांचा आजार बळावला नि ते मृत्यूच्या सानिध्यात गेले. त्यांनी आपल्या मृत्यूपत्रात वरील प्रचारासाठीच एक लाख रुपये सुभाषचंद्रांच्या नावे केले नि ते मृत्यू पावले. त्यांच्या अंतिम इच्छेप्रमाणे त्यांचा मृतदेह 'नरकुंडा' बोटीने हिंदुस्थानात पाठविण्याची व्यवस्था सुभाषचंद्रांनीच केली. त्यांचा अंत्यविधी पुढे मुंबईतच झाला.

डिसेंबर १९३४ मधे त्यांचे वडील हिंदुस्थानात अत्यवस्थ झाले. तेव्हा त्यांना भेटण्यासाठी हिंदुस्थानात येण्याची अनुज्ञा त्यांनी सरकारकडे मागितली तेव्हा वडिलांशिवाय दुसऱ्या कोणालाही भेटायचे नाही आणि आपल्या घरातच रहायचे या अटींवर सरकारने त्यांना परवानगी दिली. पण ते जानेवारी १९३५ त्या पहिल्या आठवड्यात इकडे पोचले. त्यावेळी त्यांचे वडिल मृत्यू पावल्याचेच वृत्त त्यांना समजले. १० जानेवारी १९३५ ला त्यांना परत युरोपला प्रयाण करावे लागले.

व्हिएन्ना येथे त्यांच्यावर एक शस्त्रक्रिया करण्यात करण्यात आली. त्यानंतर त्यांनी आपले "Indian Struggle" हे प्रसिद्ध पुस्तक लिहिण्यास घेतले. ते लिहून घेण्यासाठी एमिली शेंकिल ही एक २५ वर्षाची, मध्यम-वर्गीय ऑस्ट्रियन तरुणी त्यांच्याकडे येई. पुस्तकाची मुद्रणप्रतही तिनेच टंकलिखित केली. तिच्या या सहाय्याचा ह्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत त्यांनी साभार उल्लेख केला आहे. हे पुस्तक पुढे प्रसिद्ध झाले नि सरकारने ते लागलीच जप्तही केले. याच मुक्कामात सुभाषचंद्र मुसेलिनी नि डि व्हॅलेरा अशा राष्ट्र प्रमुखांना भेटले नि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य लढ्याला त्यांनी त्यांची सहानुभूतीही मिळवली. त्यांच्या या हालचाली सरकारने लक्षात ठेवल्या होत्या नि ८ मार्च १९३६ ला हिंदुस्थानात परतताच सरकारने त्यांना अटक केली. तुरुंगात ते पुन्हा आजारी पडले. तेव्हा देशभर त्यांच्या सुटकेसाठी चळवळ झाली, नि मार्च १९३७ मधे त्यांची सरकारने सुटका केली. मग प्रकृति स्वास्थ्यासाठी पुन्हा युरोपला गेले. गांधीवादी काँग्रेसपुढाऱ्यांचा आपल्या विषयींचा दुरावा कमी करणारे काही उद्‌गार सुभाषचंद्रांनी पुन: पुन: काढले नि त्यामुळेच काँग्रेसच्या अध्यक्ष पदासाठी वरील लोकांनी त्यांचीच निवड केली, नि १९३८ च्या हरिपुरा काँग्रेस अधिवेशनाचे ते अध्यक्ष झाले. याच्या आधी नोव्हेंबर १९३७ मध्ये डलहौसीला विश्रांतीसाठी रहात असतांना त्यांनी प्रख्यात वंग साहित्यिक विजयरत्न मुझुमदार यांना भेटीस बोलावले. त्या भेटीत त्यांचे संभाषण झाले त्यात नेताजींच्या भावी संकेतांचे पूर्ण प्रतिबिंब दिसून येते. त्याचा वृत्तांत

मुझुमदारांनीच पुढे "The seed of Azad Hind Fauz." या मथळ्याखाली अमृतबझार पत्रिका पत्रात प्रसिद्ध केला आहे. 'आझाद हिंदेर अंकुर' या नावाने तो बंगालीतही प्रसिद्ध झाला आहे. त्यावेळी नेताजींनी मुझुमदारांना विचारले, "शिवाजीवर बंगालीत एकही पुस्तक नाही काय ?" तेव्हा' तसे एक पुस्तक होते नि ते जप्तही झाले असे सांगितले. तेव्हा एकदम आवेशाने नेताजी ओरडले "जप्त झालं ?" सर्व बंगाली वृत्तपत्रकार व साहित्यिक मग निरुपयोगी (वर्थलेस) आहेत. त्या जप्तीविरुद्ध (त्यांच्याकडून) काहीही आंदोलन झालेले मला आठवत नाही." तसं आंदोलन झाले होते. असे मुझुमदारांनी सांगताच, सुभाषचंद्र मग विचारात गढून गेले. मग एकदा निश्चय झाल्याप्रमाणे निश्चयी मुझुमदारांना म्हणाले, "लवकरच एक दिवस असा येईल की हिंदी लोकांना आपल्या स्वातंत्र्य युद्धात शिवाजीचंच उदाहरण गिरवावं लागेल ! परकीय सरकारला हाकलून लावण्यासाठी आपल्याला महाराष्ट्राच्या मार्गानेच गेलं पाहिजे ! मुझुमदारांनी विचारले, "अत्याचारी की अनात्याचारी मार्गाने ?"

सुभाषचंद्र उत्तरले,"तुम्हाला वाटेल त्या ! माझं म्हणणं मी स्पष्ट केलं आहे !" *"शिवाजी ! शिवाजी ! शिवाजी !"* हाच आपला आदर्श, आपलं ध्येय वाक्य, ध्रुवतारा झाला पाहिजे. तुम्ही साहित्यिकांनी त्यांच्याच शिकवणुकीचा प्रसार कर्तव्य म्हणून केला पाहिजे !

शिवाजीने आग्र्याहून केलेल्या पलायनाविषयी बोलताना ते म्हणाले, "तो तर ठोशास ठोसा होता. सैतानाला फसवायचं होतं नि ते फसवलं गेलंही ! महाराजांसमोर एक जिवितकार्य (मिशन) होतं ! हे जिवीत कार्य उच्च उत्तुंग आणि महान होतं. त्यांना आपला देश परकीय सत्तेच्या हातून, दडपशाहीतून स्वतंत्र करायचा होता. The Devil had to be fooled and was befooled. Maharaj had a mission. High lofty & great was the mission in his life.

याच मार्गांचा अवलंब करुन पुढे नेताजी हिंदुस्थानातून ब्रिटीश शत्रूच्या हातून निसटून गेले, नि त्यांनी आझाद हिंद सेनेचे नेतृत्व करुन, स्वत: सशस्त्र स्वातंत्र्य लढा लढवला. ते संकेतच त्यांच्या वरील उद्‌गारात दिसतात.

काँग्रेसच्या ५१ व्या अधिवेशनात हरिपुरा येथे सुभाषचंद्रांनी जे अध्यक्षीय भाषण केले त्यांत ब्रिटीश सरकारविरुद्ध लढा चालू ठेवला पाहिजे असे त्यांनी प्रतिपादन केले, तरी निकडीचा असा काही पवित्रा गांधी प्रभुती विरुद्ध घेतला नाही ! तो गट सध्या लढा पुकारण्याच्या बाजूचा नव्हता. सुभाषचंद्रांची तो करण्याची उत्कट इच्छा होती. त्यामुळे त्यांनी एकाद वर्षात तशी मतप्रणाली दाखवताच त्यांना दुसऱ्यांदा, १९३९ च्या त्रिपुरा येथील काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून न निवडण्याची लक्षणे गांधीनी दाखविली. तेव्हा ती अध्यक्षीय निवडणूक लढवण्याचाच पवित्रा सुभाषचंद्रांनी घेतला. गांधीवादी गटाने डॉ. पट्टाभि सिताराम्या यांना आपला प्रतिनिधी म्हणून उभे केले. पण त्यांना पराभूत करून सुभाषचंद्र निवडून आले. पण त्यानंतर पं. नेहरूंसह सर्व काँग्रेस पुढाऱ्यांनी सुभाषचंद्रांशी असहकार पुकारला. काँग्रेस कार्यकारिणी नियुक्त करणेही त्यांना अशक्य त्यामुळे त्रिपुरी अधिवेशनानंतर सुभाषचंद्रांनी अध्यक्ष-पदाचे त्यागपत्र दिले नि पुढे तर त्यांना बेशिस्तीसाठी काँग्रेसमधूनच कार्य-कारिणीच्या ठरावाने ऑगस्ट १९३९ पासून तीन वर्षासाठी काढून टाकण्यात आले. ३ मे १९३९ ला सुभाषचंद्रांनी नवीन पक्ष स्थापन केला, त्याचे नाव"फॉरवर्ड ब्लॉक". त्याच्या वतीने त्यांनी देशभर सरकारविरोधी लढ्याचा पुरस्कार केला. ब्रिटीश सरकार त्यांच्या विरुद्धच होते. त्यामुळे त्यांच्या पत्रातील 'डे ऑफ रेकनिंग' या लेखासाठी नि त्यांच्या एका आक्षेपार्ह भाषणासाठी सरकारने त्यांच्यावर खटला भरला. त्याच मन:स्थितीत त्यांनी ६ एप्रिल १९४० पासून कलकत्त्यातील अंधार कोठडीचे स्मारक, "हॉलवेल मॉन्युमेंट" हलवण्यासाठी चळवळ सुरु केली. पुढे २२ जून १९४० ला ते शेवटचे मुंबईला आले नि अचानक फोन करुन सावरकरांना भेटण्यास आले. त्याच दिवशी ते जीना आंबेडकर यांनाही भेटून आले. सावरकरांच्या भेटीत युद्धकाळात करायच्या स्वातंत्र्य लढ्याची चर्चा झाली. त्यावेळी आधीच्या महायुद्धात सावरकरांच्या सहकाऱ्यांनी विदेशात हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी केलेल्या चळवळीची माहिती देऊन सावरकरांनी म्हटले, "बाहेरून स्वातंत्र्य लढ्यास सहाय्य करणाराही एक पक्ष पाहिजे. त्याचे नेतृत्वही महत्वाचे आहे." तेव्हा हो ! पण तसे नेतृत्व करण्यास जायचे कोणी नि कसे ? त्यावर तेच शब्द उच्चारून सावरकरांनी आधींच्या महायुद्धांतील हरदयाळ प्रभृतींच्या अमेरिकेकडील पलायनाचा उल्लेख केला. यावेळी हिंदुस्थानाबाहेर निसटून जाण्याचा ठाम बेत सुभाषचंद्रांच्या मनात नसेलही ! पण त्या दिशेने त्यांचे विचार मात्र सुरु झाले, कारण त्यांनीच पुढे त्या आशयाचा वृत्तांत सांगितला आहे.

३ जुलै १९४० ला त्यांचा हॉलवेल विरोधी प्रत्यक्ष लढा सुरु होणार होता. तेव्हा २ जुलैलाच भारत संरक्षण निर्बंधाखाली सरकारने त्यांना अटक केली. २० नोव्हेंबर १९४० पर्यंत याकामी आपणावर झालेल्या अन्यायाचे

विवेचन करणारी तीन आवेदने त्यांनी राज्यपालांकडे केली. त्यातील शेवटच्या आवेदनात हा अन्याय असाच चालू राहिला तर २६ नोव्हेंबर १९४० पासून आपण आमरण उपोषण करु असे अंतिमोत्तर सरकारला दिले. २९ नोव्हेंबरला ते सुरुहि केले. त्यात त्यांची स्थिती अत्यवस्थ झाली. तेव्हा ५ डिसेंबर १९४० ला सरकारने त्यांना तुरुंगातून सोडून दिले.

३८/२ एल्जिन रोडवरील घरांत ते रहात असताना त्यांनी आपण आता आपल्या खोलीत तासनतास ध्यानस्थ बसतो असे वृत्त बाहेर पसरवले आपल्या खोलीत कोणालाही येऊ देत नाहीसे झाले. त्याच मिषांत असता त्यांनी हिंदुस्थानातून अफगाणिस्तान मार्गाने बाहेर निसटून जाण्याची योजना आखली.

१५ जानेवारी १९४१ ला रात्री ८ वाजता पठाणाच्या वेषात, झियाउद्दीन नावाने पेशाबरला जाणारा प्रवासी म्हणून ते कलकत्त्यापासून ४० मैलावरच्या एका लहान स्थानकावर आगगाडीत बसले, नि १७ जानेवारीला पेशावरला पोचले. तेथे भगतराम नावाच्या तरुणासमवेत पायीच २१ जानेवारीला त्यांनी काबूल गाठले. मग तेथील इटालियन दूतावासाच्या सहाय्याने १८ मार्च १९४१ ला रात्री ९ वाजता "आर्लांदो मास्सोत्ता" नावाने मास्को मार्गे बर्लिनला आले.

बर्लिनला त्यांनी हिटलर नि डॉ. गोबेल्स यांची भेट घेतली. त्यांनी दिलेल्या अर्थ सहाय्याने तेथे आझाद हिंद रेडिओ केंद्र सुरु केले. त्यावरची त्यांची भाषणे इकडे गुप्तपणे ऐकतांना स्वातंत्र्यवाद्यांना युद्धकाळात फार आनंद वाटे. पुढे एका जर्मन पाणबुडीने अबीद हसन नावांच्या सहाय्यकासह, वाटेत जपानी पाणबुडीवर चढून ते २ जुलै १९४३ ला सिंगापूर येथे आले. तेथे निर्वासित देशभक्त दासबिहारी बोस यांनी त्यांचे स्वागत केले. पुढे ते टोकियोला पोचले. तिथे जपानी पंचप्रधान जनरल टोजो यांची त्यांनी भेट घेतली नि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य लढ्यास त्यांचा पाठिंबा मिळविला.

बर्लिनच्या वास्तव्यात त्यांनी एमिली शेंकेल या तरुणीशी गुप्तपणे विवाह केला. त्यांना अनिता नावाची एक मुलगीही झाली. त्यांनी बर्लिन सोडले तेव्हा ती दिवसांची होती. या दोघी हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावरही विद्यमान राहिल्या आहेत.

पूर्वेकडे जपानने ब्रिटीशांचा पराभव केल्यानंतर ५० सहस्र हिंदी युद्धबंदीची जनरल मोहनसिंग यांनी आझाद हिंद सेना उभारली होती, तिचे नेतृत्व स्विकारून २३ ऑक्टोबर १९४३ ला शेवटी त्यांनी स्वतंत्र हिंदुस्थानचे दुसरे अस्थाई सरकार स्थापन केले. त्याला जपान, जर्मनी, इटली इ. ए राष्ट्रांनी मान्यता दिली होती. मग कित्येक युद्ध आघाड्यांवर आझाद हिंद सेनेने दोस्त राष्ट्रांविरुद्ध लढाई करीत १८ मार्च १९४४ ला त्या सेनेच्या अग्र पथकांनी इंफाळमार्गे हिंदुस्थानच्या प्रदेशात प्रवेश करुन तो प्रदेश स्वतंत्र केला. पण पुढे दोस्तसेनेने जपानचा इतर देश पुन्हा जिंकत पराभव केला नि १६ ऑगस्ट १९४५ ला जपानने शरणागती पत्करली. तरी पण आम्ही अजून शरणागती पत्करलेली नाही, असे म्हणत १८ ऑगस्ट१९४५ एका विमानाने ते युद्ध आघाडीवरून टोकियोला निघाले पण विमान वाटेत फार्मोसा बेटावर कोसळून पडले नि त्यांत नेताजी सर्व शरीर पेटले असतानाच्या अवस्थेत विमानाबाहेर पडून दिवंगत झाले ! मृत्यू समयीही त्यांनी सान्निध्यातील हनिबूर रहमान यास हिंदुस्थान लवकरच स्वतंत्र होईल, असेच देशबांधवांना सांगण्यास सांगितले.

नेताजी मृत्यू पावले पण युद्धकाळात त्यांनी केलेली जहाल-स्वातंत्र्य-लालसेने भरलेली भाषणे नि त्यांच्या घोषणांनी अजरामर झाले. 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आझादी दूँगा ।" ही आझादहिंद सेनेला त्यांनी दिलेली हाक आणि 'चलो दिल्ली' ही हाक त्याचप्रमाणे देशबांधवांना नमस्कार म्हणून जयहिंद ही घोषणा देशभर घुमत राहिली.

त्यांच्या सशस्त्र लढ्यामुळेच आता आपले सैन्यही स्वातंत्र्य लालसेने वेडे झालेले असल्यामुळे त्याच्या जोरावर हिंदुस्थान आपल्या टाचेखाली ठेवणे अशक्य आहे, असे थेट ब्रि. पार्लमेंटमध्ये सांगत पंतप्रधान मेजर ॲटली यांनी हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याचे बिल पार्लमेंटमध्ये मांडले. त्यावरून त्यांच्या परकीय सत्तेवर शेवटचा वर्मी प्रहार नेताजींनीच केला हे उघड होते.

आणि त्यामुळेच शेवटी १५ ऑगस्ट १९४७ ला हिंदुस्थान स्वतंत्र झाला !

□□

श्री. वि. श्री. जोशींनी क्रांतीकारकावर अनेक पुस्तके लिहिली असून 'शृंखला खळखळा तुटल्या' हे सुभाषबाबूंचे जीवनचरित्र विशेष गाजलेले पुस्तके. नुकतीच त्यांना 'महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळा'तर्फे गौरववृत्ती देण्यात आली आहे.

मोरारजी देसाईंच्या जन्मशताब्दी निमित्ताने

● के. जी. जोगळेकर

फेबुवारीच्या २९ तारखेला जन्माला आल्यामुळे चार वर्षातून एकदाच मोरारजी देसाईंचा वाढदिवस येत असे. २९ फेब्रुवारी, १९९६ ला ते शतायुषी झाले असते. मागल्या वर्षी फेब्रुवारी महिन्या अखेरपासूनच मोरारजी देसाईंची जन्मशताब्दी साजरी करण्याची जय्यत तयारी सुरु झाली होती. शंभराव्या वर्षात पदार्पण करताच भारतातून आणि जगभरातून त्यांना अभिनंदनात्मक संदेश येऊ लागले होते. ही जन्मशताब्दी साजरी करण्यासाठी एका राष्ट्रीय समितीची स्थापनाही करण्यात आली होती आणि मोरारजी भाई आपले शतक पूर्ण करतील व शतायुषी होणारे पहिले भारतीय राजकारणी ठरतील अशी सर्वानाच खात्री होती. ह्या खात्रीमागे होता मोरारजींचा दृढ आत्मविश्वास ज्याने पडतीच्या काळातही कधी त्यांची साथ सोडली नव्हती. मात्र काळाला हे मंजूर नव्हते आणि शंभराव्या वर्षात पदार्पण केल्यानंतर केवळ दोनच महिन्यात मोरारजी निवर्तले. शतकाकडे विक्रमी वाटचाल करणाऱ्या जिद्दी खेळाडूची ९९ वर विकेट उडावी तशीच ही शोकांतिका ठरली. मोरारजींना वाढदिवसाच्या निमित्ताने होणारा गाजावाजा कधीच आवडत नसे म्हणून तर त्यांनी अगदी शांतपणे ह्या जगाचा निरोप घेतला नसेल ना !

आयुष्याची शेवटची १६ वर्षे मोरारजींनी सक्रिय राजकारणातूनच निवृत्त होऊन एका वयोवृद्ध अनुभवी नेत्याप्रमाणे सल्लागाराची भूमिका निभावत काढली. ह्याच काळात त्यांना भारत रत्न व निशा-ने-पाकिस्तान या भारत व पाकिस्तान सरकारच्या सर्वोच्च पदवीने भूषविण्यात आले. ह्यापूर्वी एकाच व्यक्तीला हे दोन्ही गौरव कधीच प्राप्त झाले नव्हते.

१९७७ साली वयाच्या ८१व्या वर्षी पंतप्रधान बनून त्यांनी नवा विक्रम तर केलाच. पण हे पद म्हणजे त्यांच्या जिल्हाधिकारी ते त्यावेळच्या मुंबई राज्याचे मंत्री व मुख्यमंत्री ते केंद्रीय मंत्रीमंडळात कॅबीनेट मंत्री व त्यानंतर विरोधी पक्षनेते या लांबच्या प्रवासाची फलश्रुती ठरली. पाच दशकाच्या या कारकीर्दीत त्यांचे जितके चाहते होते तेवढेच विरोधकही होते.

तत्वाला जपण्याचा अट्टाहास हेच त्यांच्यातील वेगळेपण. तत्वाचा प्रश्न आला तर ते मोडेन पण वाकणार नाही म्हणणाऱ्यांपैकी होते. आपल्या मनातील गोष्ट ते निर्भिडपणे बोलत असत व त्याप्रमाणे चालतही असत. पोटात नसलेली गोष्ट कधी त्यांनी उगीचच ओठावर आणली नाही. प्रसंगी काहीतरी बोलून वेळ मारुन नेऊन अप्रिय घटना त्यांना टाळता आल्या असत्या पणं मोरारजी त्यातले नव्हते." आपलं बुवा हे असं आहे. ह्याउपर तुमची मर्जी." असाच त्यांचा सूर असे.

त्यांचं बालपण दारिद्र्यात गेलं. तारुण्यात पदार्पण करताच वडिलांच्या मृत्यूमुळे एका मोठ्या कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर आली. मुंबईला येऊन त्यांनी राहण्याची व खाण्याची मोफत सोय असलेल्या एका शाळेत प्रवेश घेतला. दर महिन्याला मिळणारे स्कॉलरशिपचे दहा रुपये ते कुटंबियांसाठी आईच्या नावाने पाठवत. सुट्टीत घरी जाण्यासाठी काय ते त्यांना पैशाची गरज पडत असे.

बऱ्याच वर्षानंतर हाती पैसा येताच त्यांनी शाळेने त्यांच्यावर केलेल्या खर्चाची पाई न् पाई चेकच्या रुपाने परत फेडली !

लहानपणाच्या दारिद्र्यातील अनुभवाने त्यांना पैशाची किंमत करायला शिकविले. ते साहजिकच काटकसरी बनले. पंतप्रधान असताना लांबच्या दौऱ्यावर जातेवेळीही ते एका छोट्याशा अटॅची मध्ये मोजकेच कपडे नेत. सुरक्षिततेच्या कारणामुळे गाडी लांबच्या पल्ल्याने नेल्याचे त्यांना आवडत नसे व तसे लक्षात येताच परतीचा प्रवास ते नेहमीच्या मार्गाने करीत असत.

पंतप्रधानांच्या निवासस्थानी रोज सकाळी जनता दरबार भरवण्याची पद्धत पंडित नेहरुंच्या काळापासून अस्तित्वात होती. ह्या दरबारात देशातील दूरदूरच्या ठिकाणाहून लोक येत व आपली गाऱ्हाणी ऐकवीत. त्यातील काही खरी काही खोटी. ती ऐकून घेण्यामागे खरा उद्देश नेता आणि जनता यांच्यात जवळकी साधणे हा असे. परंतु हे मोरारजींना मात्र कधी पटले नाही. त्यामुळे ते नेहमी दरबारी येणाऱ्यांना

"राज्यसरकार कडून मदत मागा व तेथे काम झाले नाही तरच इथे या." असे स्पष्ट सांगत.

पंतप्रधानांनी भूकंपग्रस्त, दुष्काळ-ग्रस्त किंवा पूरग्रस्त प्रदेशाला प्रत्यक्ष भेट देऊन तेथील दु:खी जनतेला सांत्वना देण्याची प्रथा ही मोरारजींना खपत नसे. जनतेच्या पीडा दूर करण्याचे कार्य सोडून अशा प्रसंगी आलेल्या नेत्याचे आदरातिथ्य करण्यातच स्थानिक प्रशासनाचा वेळ मोडतो असे त्यांचे म्हणणे." त्यांना लागणाऱ्या सर्व वस्तूंचा पुरवठा मी करीन मात्र मदतकार्य जोमाने सुरु झाल्यानंतरच माझे तिथे जाणे इष्ट आहे." ते म्हणत. हा खरा व्यवहारीपणा पण त्यांच्या विरोधकांना तो त्रयस्थपणा वाटे.

मोरारजी पंतप्रधान होण्याच्या कैक वर्षे आधीच विल्यम हँजेन यांनी "आफटर नेहरु हू?" या पुस्तकाद्वारे पाश्चिमात्यांना नेहरुंचा वारसा मोरारजीकडे न देण्याचा इशारा केला होता. ते लिहितात "पश्चिमात्य देसाईंना पुराण मतवादी मानतात. कम्यूनिस्टांना ते प्रतिगामी वाटतात आणि ते स्वत:ला गांधीवादी व समाजवादी म्हणवितात. प्रत्यक्षात मात्र ते यांपैकी कुठल्याही चौकटीत बसत नाहीत. ते "जुनं ते सोनं" मानणाऱ्यांपैकी नाहीत आणि बदल घडवून आणण्यास मागे पुढे पहात नाहीत म्हणूनच कम्यूनिस्टांचा हा मोठा गैरसमज म्हणायचा. राहता राहिला गांधीवाद, तर लोकांचे प्राण व मालमत्ता वाचविण्यासाठी कठोर कारवाई करुन गांधीवादाचे मूलतत्व असलेल्या अहिंसेला मोरारजींनी नेहमीच अव्हेरलं."

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ मोडून काढण्यासाठी त्यांनी बडगा वापरलाच होता. तीस वर्षानंतरही महाराष्ट्रीय जनतेच्या मनात त्याकाळच्या पोलीस गोळीबारात झालेल्या १०५ लोकांच्या मृत्यूची जखम ताजी आहे आणि त्यामुळेच मोरारजींवर त्यांचा राग अजून कायम आहे. मोरारजींनी आपल्या आत्मचरित्रात या घटनेबद्दल अतिशय खंत व्यक्त केली आहे पण त्याबरोबरच ते म्हणतात, मुंबईकरांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलिस गोळीबाराशिवाय दुसरे गत्यंतरच नव्हते. मी आदेश दिला असता पोलिसांनी गोळीबार केला नसता मात्र त्यामुळे अनेक निर्दोष जीवांची हत्या घडली असती. त्यामुळे दंगली थांबविण्यासाठी त्यावेळी मी जे केले ते बरोबरच असे त्या क्षणी व आताही मला वाटते."

हा त्यांचा मार्ग. आपण आपले कर्तव्य पार पाडावे आणि त्यासाठी वाटेल ती किंमत अगदी स्वेच्छेने मोजावी. ह्या स्वच्छ पारदर्शीपणामुळे त्यांना भारतात व परदेशातही अनेक मित्र लाभले.

बऱ्याच लोकांना ते कठोर वाटत. प्रश्नाचे उत्तर प्रश्नानेच देण्याच्या त्यांच्या लकबीमुळे पत्रकारांचा रोष ते ओढवून घेत. विरोधकांना ते हेकेखोर वाटावेत इतके कठोर वाटत. काहींना ते विशिष्ट मतवादी वाटत. डी. एफ. कारका हे त्यांचे विरोधक हळू हळू त्यांचे चाहते बनले व शेवटी आत्म चरित्रकारही. मोरारजींबद्दल ते लिहितात, " ते दिसत नसले तरी खूपच मानवतावादी आहेत. मूळत:च लाजरे असल्यामुळे ते हृदयशून्य असल्याचा गैरसमज होतो. ते नक्कीच तत्ववादी आहेत. तत्वापुढे इतर सर्वच गौण आहे."

लेखक मुक्त पत्रकार आहेत.

□□

योजना मासिकाचे वर्गणीदार कोणत्याही महिन्यापासून होता येते.

वार्षिक वर्गणी ५० रुपये

किरकोळ अंक ५ रुपये

विशेष अंक ८ रुपये

वर्गणी पाठविण्याचा पत्ता

'योजना' मासिक कार्यालय

३८, युसुफ बिल्डिंग, ४था मजला, वीर नरिमन मार्ग हुतात्मा चौक, मुंबई - ४०० ००१.

दूरध्वनी : २०४ ०४ ६१

केंद्र राज्य वित्तीय संबंध आणि दहावा वित्त आयोग – उपेक्षा आणि अपेक्षा

● प्रा. डॉ. शिवाजी पाटील

भारतीय घटनेनुसार घटकराज्य सरकारे आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांना स्वायत्तता देण्यात आली असली तरी प्रत्यक्ष व्यवहारात ती दिसून येत नाही. त्यामुळेच भारतात केंद्रराज्य वित्तिय संबंधाबाबत वाढते संघर्ष आणि तणाव निर्माण झालेले दिसून येतात. भारतासारख्या विशाल खंडप्राय देशात आपण संघराज्य पद्धतीचा स्वीकार करून वित्तव्यवस्थेत स्थैर्य प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने घटनात्मक आधार घेतला आहे. घटनात्मक तरतुदीनुसार केंद्र सरकारकडून घटकराज्य सरकारांना साधन संपत्तीचे वितरण केले जाते. भारतीय घटनेच्या कलमक्रमांक २८० (१) च्या अन्वये भारताच्या राष्ट्रपतींना वित्तआयोग नेमण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत. वित्त आयोग घटकराज्यांना करावयाच्या साधनसंपत्तीचे वाटप आणि वितरणाबाबत केंद्रसरकारला शिफारशी सादर करतात. आणि त्यानुसार केंद्रसरकार घटकराज्यांना साधन-संपत्तीचे वाटप करते. एखाद्या घटकराज्याला त्याच्या गरजेनुसार साधनसंपत्ती अपुरी पडत असेल तर ती उपलब्ध करुन देण्याची शिफारस हे आयोग करतात.

स्वातंत्र्योत्तर काळापासून भारत सरकारने एकूण दहा वित्तआयोग नेमले आहेत. दहाव्या वित्तआयोगाने आपल्या शिफारशी सरकारला नुकत्याच सादर केल्या आहेत. या वित्त आयोगांनी प्राप्तीकर आणि केंद्रीय उत्पादन शुल्क यापासून मिळणाऱ्या एकूण उत्पादनापैकी किती उत्पन्न घटकराज्यांना किती प्रमाणात आणि कोणत्या निकषानुसार द्यावे याच्या शिफारशी केल्या आहेत. या वित्तआयोगांनी या संदर्भात सरकारला सादर केलेल्या शिफारशींचे महत्त्वाचे मुद्दे आपल्याला पुढील तक्त्यावरुन दिसून येतील.

माजी केंद्रीय मंत्री श्रीयुत के. सी. पंत यांच्या अध्यक्षतेखाली भारत सरकारने दहाव्या वित्तआयोगाची स्थापना केली. या आयोगाने केंद्रीय साधनसंपत्तीचे (विभाज्य करांचे) वाटप अनुदाने, मदत यासंदर्भात सरकारला शिफारशी सादर केल्या आहेत. भारतातील सद्य स्थितीतील आर्थिक आणि राजकीय अस्थैर्य, प्रादेशिक असमतोल, बेरोजगारी, भाववाढ, लोकसंख्या प्रस्फोट यासारख्या समस्या आणि आंतरराष्ट्रीय व्यवहार शेषातील असमतोल या बाबी विचारात घेता दहाव्या वित्त आयोगाच्या शिफारशी आपल्याला तारक ठरतील असे आपल्या वाटते.

वास्तवतेवर अधिक भर

आतापर्यंतच्या वित्त आयोगांच्या शिफारशींच्या तुलनेने दहाव्या वित्तआयोगाच्या शिफारशी महत्त्वपूर्ण आहेत. कारण या आयोगाने आतापर्यंत चालत आलेल्या परंपरागत तत्त्वांना फाटा देऊन सर्व विभाज्य कर एकाच पातळीवर आणून केंद्र सरकारचे धोरण अधिक वास्तववादी केल्याचे दिसून येते. विशेषत: प्राप्तीकर आणि केंद्रीय उत्पादन शुल्काच्या संदर्भात ते अधिक प्रयत्नशील करण्याचा प्रयत्न केला आहे. एवढेच नव्हेतर या आयोगाने केंद्राकडून घटकराज्यांच्या अंदाजपत्रकात तूट निर्माण होणार नाही याची खबरदारी घेतली आहे. तसेच भांडवली गुंतवणूक जास्तीत जास्त कशी वाढेल या दृष्टीकोनातूनही शिफारशी केल्या आहेत.

दहाव्या वित्तआयोगाने परंपरागत चालत आलेल्या तुटीच्या अंदाजपत्रकाचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी केंद्र सरकार आणि घटकराज्य सरकारांच्या अंदाजपत्रकीय धोरणात चलनविषयक तूट कशी कमी करता येईल या बाबींकडे अधिक लक्ष दिले आहे. भारतातील भविष्यकालीन समस्यांचा विचार करून वित्तीय मालमत्तेची रचना, मानवीय आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा परिपूर्ण वापर यात परिस्थितीनुरुप सुधारणा करून अप्रगत राज्यांना अधिक मदत देण्याची शिफारस या आयोगाने केली आहे. तसेच घटकराज्यांनी आपल्या साधनसंपत्तीचा पाया अधिक मजबूत

करण्यासाठी आणि जनतेला अधिक चांगल्या सेवा देऊन खर्च कमी करण्यासाठी स्वत: पूरक धोरणे स्वीकारावयाची आहेत अशी शिफारस या आयोगाने केली आहे. दहाव्या वित्त आयोगाने घटकराज्यांच्या योजना-कालीन उत्पन्न आणि खर्च या बाबत १९९६ ते २००० या कालावधीसाठी अंदाज बांधून उत्पन्नातील बदलांचे धोरण स्वीकारले आहे. या सर्व बाबी विचारात घेता या आयोगाने सिद्धांतापेक्षा व्यवहारावर अधिक भर देऊन वास्तवतेला अधिक महत्त्व दिलेले दिसून येते.

दीर्घकालीन विकासावर जास्तीत जास्त भर

दहाव्या वित्तआयोगाने दीर्घ-कालीन विकास नितीवर भर देऊन आपल्या शिफारशी सादर केल्या आहेत. या आयोगाच्या अंदाजानुसार भारतीय अर्थव्यवस्थेत १९९५-९६ नंतर आधिक्याची/ शिलकी अंदाज पत्रके स्वीकारली जातील. अर्थात या आयोगाचे अंदाज खरे ठरले तर भारताने विकासाचा बराच मोठा पल्ला गाठलेला असेल असे म्हणावयास हरकत नाही. अर्थात हे भविष्यकाळ ठरवेल. या आयोगाच्या मते १९९५ ते २००० या काळात केंद्र आणि घटकराज्यांच्या अंदाजपत्रकात तूट दिसून येईल. परंतु ती कायमस्वरुपी असणार नाही. अर्थात त्यासाठी आपल्याला खर्च कपातीचे धोरण स्वीकारावे लागणार आहे. या आयोगाच्या मते केंद्र आणि घटक राज्यांनी योजनेतर खर्चात कपात केली तर, विकासाचा दर वाढवून केंद्रराज्य वित्तीय संबंध सुधारतील. अशाप्रकारे एक आशावादी दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून राष्ट्राच्या प्रगतीबाबत त्यांनी

अ क्र	वित्तआयोग (अध्यक्ष)	प्राप्तीकर	उत्पादन शुल्क	निकष १) लोकसंख्या २)वसुली		अनुदाने/मदत
१	२	३	४	५		६
१)	के. सी. नियोगी (१९५१ ते ५६)	५५%	४०%	८०%	२०%	सर्वसाधारण विशेष
२)	के. संयानम (१९५६ते६०)	६०%	२५%	९०%	१०%	१८८ कोटीची तरतूद (गरजेनुसार)
३)	अशोक चंदा (१९६१ ते६५)	६६%	२०%	८०%	२०%	प्रत्येक राज्यास १२.५ तरतूद
४)	डॉ. पी. व्ही. राजमन्नेर (१९६६ते६९)	७५%	२०%	८०%	२०%	विकसित/अविकसित राज्याची वर्गवारी अनियमित खर्चासाठी स्वतंत्र तरतूद
५)	महावीर त्यागी (१९७०ते७४)	७५%	२०%	९०%	१०%	दहा अविकसित राज्यांसाठी गरजानुसार ६३८ कोटी रु. तरतूद
६)	ब्रह्मानंद रेड्डी (१९७५ ते८०)	८०%	२०%	९०%	१०%	दुष्काळ आणि पुरनियंत्रणासाठी २१ राज्यांना ५१ कोटी रु. तरतूद.
७)	न्यायमूर्ती शेलार जे. एम. (१९८१-८५)	८५%	४०%	९०%	१०%	राज्यांचे प्रशासन सुधारण्यासाठी विशेष मदत, गुजरातसाठी दारुबंदी प्रित्यर्थ १००% मदत नैसर्गिक आपत्ती ग्रस्त राज्यांना १०० कोटीची तरतूद
८)	कै. यशवंतराव चव्हाण (१९८६-९०)	८६%	९०%	८५%	४५%	तूटीच्या राज्यांना आर्थिक मदत आपत्ती ग्रस्त राज्यांना ५०% तात्काळ मदत, न्यायदान, शिक्षण, आदीवासी, पुनर्वसन, आरोग्य यासाठी ९१५ कोटी रु.
९)	एन. के. पी. साळवे (१९९१-९५)	८५%	५५%	९०%	१०%	तूटीच्या राज्यांना आर्थिक मदत, ग्रामीण राज्यांना ५०% तत्काल मदत, न्यायदान, शिक्षण आदीवासी, पुनर्वसन, आरोग्यासाठी १०० कोटी रु. तरतूद
१०)	के. सी. पंत (१९९६ ते २०००)	८५%	४५%	९०%	१०%	राज्यांची वर्गवारी—अविकसित राज्यांना अधिक मदत

वास्तव अपेक्षा व्यक्त केलेल्या दिसून येतात.

घटनात्मक तरतुदीनुसार भारतीय संघराज्य पद्धतीत वित्त आयोगांनी केंद्राकडून घटक राज्यांकडे दिल्या जाणाऱ्या रकमांच्या संदर्भात आणि अनुदानांच्या संदर्भात शिफारशी करायच्या असतात. परंतु त्यामुळे वित्त आयोगांना चाकोरी बाहेर जाता येत नाही. म्हणून काही राज्यांची उपेक्षा होते. परंतु दहाव्या वित्त आयोगाने मात्र दीर्घकालीन विकासावर जास्तीत जास्त भर दिला आहे. त्यादृष्टीने घटकराज्यांनी भविष्य-काळाच्या संदर्भात आपले वित्तीय व्यवहार कसे ठेवावेत या संदर्भात अंदाज व्यक्त करुन नवीन क्रांतिकारी पाऊल उचलले आहे असे म्हणावयास हरकरत नाही. यासंदर्भात कदाचित काही अर्थतज्ञ/विचारवंत टिका करतील की, घटकराज्यांच्या स्वायत्ततेवर हा आघात आहे, परंतु दीर्घकालीन समतोल विकासाच्या दृष्टीने हे अनुकूल पाऊल आहे असे म्हणावयास हरकत नाही.

घटकराज्यांना साधन संपत्तीची अधिक उपलब्धता

आतापर्यंतच्या वित्तआयोगांनी केंद्रसरकारला करांपासून मिळणाऱ्या एकूण उत्पन्नापैकी आणि करेतर उत्पनापैकी घटकराज्यांना दिल्या जाणाऱ्या प्रमाणात सतत वाढीचीच शिफारस केली आहे. त्याचप्रमाणे या आयोगाने देखील हे प्रमाण वाढवलेले दिसून येते. उदा. करांच्या एकूण उत्पन्नापैकी घटकराज्यांना वाटून द्यावयाचे प्रमाण १९६०-६१ मध्ये १८.४७%, १९७०-७१ मध्ये २३.७०%, १९८०-८१मध्ये ५७.१४%, १९९०-९१ मध्ये २५.२५%, १९९४-९५ मध्ये २७.७०% असे होते. ते या आयोगाने १९९६ ते २००० साठी २९% पर्यंत सूचविले आहे. परंतु असे असूनही घटकराज्यांना निधी अपूरा पडत आहे असे दिसून येते. म्हणूनच दहाव्या वित्त आयोगाने घटकराज्यांची वर्गवारी करुन अधिक विकसित राज्यांना आर्थिक मदत, आणि अविकसित राज्यांना अधिकाधिक साधनसंपत्ती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला आहे. दहाव्या वित्तआयोगाने घटकराज्यांची केलेली वर्गवारी पुढीलप्रमाणे :

अ) अधिक उत्पन्न असलेली घटकराज्ये-महाराष्ट्र, गुजरात, गोवा, पंजाब, हरियाणा

ब) मध्यम पातळीवरील उत्पन्न असलेली घटकराज्ये-आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल.

क) कमी उत्पन्नाची पातळी असलेली घटकराज्य- बिहार, मध्यप्रदेश, ओरीसा, राज्यस्थान, उत्तरप्रदेश.

ड) विशेष/खास गटातील घटकराज्ये- अरुणाचल प्रदेश, आसाम, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड आणि त्रिपुरा.

या आयोगाने घटकराज्यांची अशी वर्गवारी करुन 'अ' गटातील राज्यांना कमी आणि 'क' आणि 'ड' गटातील राज्यांना अधिक मदत कशी मिळेल हे पाहण्याचा प्रयत्न केला आहे. हा प्रयोग समतोल आर्थिक विकासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल असे म्हणावयास हरकत नाही. अर्थात असे असले तरी आर्थिक आणि बिन आर्थिक गरजा विचारात घेऊन राज्यनिहाय साधनसंपत्तीचे हस्तांतरण झाले तर ते अधिक फलदायी ठरेल असे म्हणायला हरकत नाही.

विभागीय सामायिक बाजारपेठांच्या निर्मितीवर भर

आतापर्यंतच्या वित्त आयोगांनी घटकराज्यांना वाटून द्यावयाच्या रकमेचे प्रमाण सतत वाढवलेले दिसून येते. परंतु असे असूनही घटकराज्यांना निधी अपुरा पडत आहे. असे दिसून येते. म्हणजे याचा अर्थ घटकराज्यांच्या जबाबदाऱ्या वाढल्या असल्या पाहिजे किंवा त्यांना उपलब्ध असलेल्या निधीचा वापर योग्य प्रमाणात होत नसला पाहिजे म्हणून त्यासाठी विभागीय पातळीवर सामूहिक बाजारपेठांची निर्मिती करण्याची शिफारस या आयोगाने केली आहे. त्यादृष्टीने साकत्मिक व्यवस्थापकीय धोरण आखून राज्या-राज्यांतर्गत सामायिक बाजारपेठांच्या निर्मिती संदर्भात अलिकडे काही राज्यांनी तसा प्रयोग सुरु केला आहे.

आर्थिक निकषांवर आधारित वित्तीय संबंध

भारतीय संघराज्य पद्धतीत केंद्र-राज्य वित्तीय संबंध हे आर्थिक निकषांऐवजी राजकीय निकषानुसार निश्चित केलेले असत. त्यामुळे ते निकोप नव्हते. असे मत अनेक विचारवंतानी व्यक्त केले होते. ही उणीव दूर करण्याच्या दृष्टीने दहाव्या वित्त आयोगाने आर्थिक निकषांना अधिक महत्त्व दिले.

दहाव्या वित्त आयोगाने घटक-राज्यांना आर्थिकदृष्ट्या अधिक बलवान करण्यासाठी वास्तव स्वरुपात स्वायतत्ता देण्याची शिफारस केली आहे. तसेच भारतात विक्रीकरांबाबत असलेली दरभिन्नता एकाच पातळीवर आणावी अशी शिफारस करुन घटक राज्यांचे हे प्रभावी साधन अधिक परिणामकारक

कसे ठरेल याचा प्रयत्न केला आहे. या आयोगाने घटक राज्यांना आपल्या अनावश्यक खर्चाला कात्री लावण्याची शिफारस करून होणारा खर्च उत्पादकतेशीही निगडीत असावा असेही सुचविले आहे. १९९३ मध्ये डी. टी. लकडावाला यांनी या संदर्भात मांडलेली ही वास्तववादी भूमिका या आयोगाने तत्त्वत: स्विकारली असे म्हणायला हरकत नाही. अर्थात असे असले तरी घटकराज्यांच्या अचानकपणे उद्‌भवणाऱ्या गरजा आणि साधन संपत्तीचा विनियोग या संदर्भात अधिक वास्तववादी शिफारशी या आयोगाने सुचविल्या असत्या तर प्रा. लकडावाला यांचे मत पूर्ण अर्थाने या आयोगाने स्वीकारले असे म्हणता आले असते.

नवीन आर्थिक धोरण आणि दहावा वित्त आयोग

भारत सरकारने आर्थिक वावटळीत सापडलेल्या अर्थव्यवस्थेला बाहेर काढून विकासाचा दर वाढविण्यासाठी जुलै १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरण जाहीर केले. या धोरणाच्या अनुशंगाने विचार केल्यास दहाव्या वित्तआयोगाच्या शिफारशी नवीन आर्थिक धोरणाला पूरक वाटतात. कारण या आयोगाच्या शिफारशीनुसार घटकराज्यांना उत्पादनात जास्तीत जास्त वाढ घडवून आणण्याच्या दृष्टीने केंद्राकडून अधिकाधिक मदत दिली जाईल असे दिसते. एवढेच नव्हे तर घटकराज्यांना दिली जाणारी मदत अपुरी पडू लागली तर त्यात पुन्हा वाढ करुन त्यांना अधिक मदत देण्याचे कार्य लोकसभेमार्फत केले जाईल हे महत्त्वाचे आहे.

भारतीय घटनेनुसार प्रत्येक वित्त आयोगाने सर्व घटक राज्यांना सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या एकाच पातळीवर आणून समतोल विकासासाठी शिफारशी करावयाच्या असतात. अशावेळी राजकीय डावपेच बाजूला ठेवून साधन संपत्तीचे वाटप करावयाचे असते म्हणजेच आर्थिक निकषांवर आधारीत वित्तीय संबंध दृढ करावयाचे असतात. या आयोगाने हा दृष्टीकोन तत्त्वत: स्वीकारला परंतु वास्तवात स्वीकारला नाही अशी टिका काही विचारवंतानी केली आहे. अर्थात असे असले तरी या आयोगाने नवीन आर्थिक धोरणाला पूरक शिफारसी सादर करून भविष्यकालीन विकासाचा दर वाढायला मदत केली आहे अस म्हणायला हरकत नाही.

"वित्तीय व्यवस्थापनाचा पुरस्कार करायला हवा"

भारतीय अर्थव्यवस्थेत केंद्र-राज्य वित्तीय संबंध अधिक सलोख्याचे करावयाचे असतील तर त्यासाठी घटक राज्यांनी वित्तीय व्यवस्थापनाचा पुरस्कार करायला हवा. त्यादृष्टीने आपले अंदाज-पत्रकीय धोरण केंद्राच्या अंदाजपत्रकीय घोरणाशी सुसंगत ठेवायला हवे. या संदर्भात दहाव्या वित्तआयोगाने अशी शिफारस केली आहे कि, घटकराज्यांनी आपल्या अंदाजपत्रकात योजना खर्च आणि योजनेतर खर्च अशी वर्गवारी करु नये. कारण त्यामुळे खर्च आणि त्याची उपयुक्तता यातील परस्पर संबंधाचे विश्लेषण करता येत नाही. म्हणून या सर्व व्यवहारात वित्तीय व्यवस्थापनावर अधिक लक्ष केंद्रीत करायला हवे असे म्हणायला हरकत नाही.

दहाव्या वित्त आयोगाने अनुदानांच्या संदर्भात भारताला २१ व्या शतकाकडे वाटचाल करावयाची आहे हा दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवलेला दिसून येतो. कारण या वित्त आयोगाने घटकराज्यांच्या कोषागारांचे संगणकी-करण, प्राथमिक शाळा, मुलींचे शिक्षण आणि तत्सम खास समस्यांसाठी एकूण अनुदानाच्या १२.८% विशेष अनुदाने मंजूर केली असून याशिवाय आपत्कालीन परिस्थितीसाठी जास्तीची अनुदाने मंजूर केली आहेत.

दहाव्या वित्त आयोगाने असे मत मांडले आहे की, घटक राज्यांना केवळ जास्तीत जास्त वित्तीय साधने उपलब्ध करुन चालणार नाही. तर त्यांनी त्या साधनांचा पर्याप्त वापर करुन राष्ट्रीय ध्येयधोरणाला अनुकुल अशी धोरणे स्विकारली पाहिजेत. अर्थात त्यासाठी घटक राज्य सरकारानी जाणीवपूर्वक स्वत:च विचार करावा. आपल्याला, असे दिसून येते कि, ह्या वित्त आयोगाने घटकराज्यांना जास्तीत जास्त वित्तीय स्वायत्तता देऊन अविकसित राज्यांना अधिक मदत करून सर्वांना एकाच पातळीवर आणण्याचा प्रयत्न केला आहे.

"राष्ट्रीय पातळीवर समानतेचा प्रयत्न"

दहाव्या वित्तआयोगाने राष्ट्रीय पातळीवर घटकराज्यांमध्ये सर्व प्रकारची समानता आणण्याच्या दृष्टीने विधायक शिफारशी केल्या आहेत. त्यासाठी केवळ अविकसित राज्यांना अधिक मदत वा सगळ्यांना जास्तीत जास्त वित्तीय स्वायत्तत्ता दिली नाही तर घटक राज्यांच्या करपद्धतीत समानता आणि प्रगतीशील करपद्धतीचा पुरस्कार करायला लावला आहे. विशेष म्हणजे या आयोगाने प्राप्तीकर आणि केंद्रीय अबकारी करांबाबत समानतेचे तत्त्व

(पान २७ वर)

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी दुष्टचक्राच्या विळख्यात

● डॉ. एम. एन. शिंदे

भारतामध्ये स्वातंत्र्यानंतर नियोजनकार, अर्थतज्ञ, राजकीय नेते व विचारवंतानी शेती विकासावर भर देण्याचे प्रारुपाला मंजूरी दिली, त्यामधुनच भारताची शेती विकासाला प्राधान्य देणारी पहिली पंचवार्षिक योजना १९५१ मध्ये साकारली. भारताच्या कृषी प्रधान अर्थव्यवस्थेत शेतीचा विकास झाला तरच इतर क्षेत्राच्या विकासाला चालना मिळते या जाणिवेतून शेती विकासासाठी आवश्यक असणाऱ्या विविध घटकांवर भर देण्यात आला. सहकार आर्थिक विकासाचे एक साधन म्हणून सहकाराच्या माध्यमातून शेती सुजलाम् सुफलाम् करण्याचे उद्दीष्ट ठरविणयात आले. शेतकरी सुधारला तर शेती सुधारेल व शेती सुधारली तर उद्योग, व्यापार व व्यवसायांचा विकास होऊन अर्थव्यवस्थेला बळकटी येईल. या जाणिवेतून सहकार महर्षी विखे पाटील, धनंजयराव गाडगीळ यांनी प्रवरानगर येथे सहकारी साखर कारखानदारीची मुहुर्तमेढ रोवली. कै. मा. यशवंतराव चव्हाण, कै. मा. वसंतदादा पाटील, मा. शरद पवार व इतर अनेकांच्या प्रयत्नातून ती महाराष्ट्रात वाढली, फुलली, फळली, आणि तिची मधाळ गोडी महाराष्ट्रातील शेतकरी, शेतमजूर व सर्वसामान्य जन आज चाखत आहेत, परंतु आज विखे-चव्हाण-दादांच्या सहकारी महाराष्ट्रातील गोड साखर उस उत्पादक शेतकऱ्यांना कडू लागत आहे. सहकार क्षेत्रातील या धुरिणांनी ज्यांच्यासाठी ही सहकारी साखर कारखानदारी उभारली तो उस उत्पादक शेतकरी मात्र हतबल होऊन रस्त्यावर आला आहे.

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी केंद्र व राज्य सरकार कामगर, सहकारी साखर कारखानदारीतील काही नेते यांच्यामुळे अडचणीत आल्याचे चित्र दिसून येत आहे. ही परिस्थिती बदलली पाहिजे. अन्यथा सहकारी साखर कारखानदारीतून महाराष्ट्राच्या ग्रामीण विभागात जी कांही आर्थिक विकासाची बेटे निर्माण झाली आहेत ती नष्ट होतील परिणामी शेतकरी, शेतमजूर व सर्वसामान्य गरीब माणूस त्यामध्ये भरडला जाईल.

सन १९५१ मध्ये भारतात १७.०७ लक्ष हे. क्षेत्र उस लागवडीखाली होते. ते १९९२-९३ मध्ये वाढून ३६.१८ लक्ष हेक्टर झाले, याच काळात उसाचे उत्पादन ५७०.५१ लक्ष टनावरुन २३०८.३२ लक्ष टन इतके वाढले. भारतात १९९३-९४ मध्ये ९७ लक्ष टन व १९९४-९५ या वर्षात १४५ लक्ष टन साखरेचे उत्पादन झाले. आज भारतामध्ये देशांतर्गत साखरेची मागणी १२० लक्ष टन आहे, इ. स. २००० मध्ये देशांतर्गत उपभोगासाठी १७० ते २०० लक्ष टन साखरेची गरज भासणार आहे. दरवर्षी देशातील साखरेची मागणी ५ लक्ष टनाने वाढत आहे. ही वाढती मागणी लक्षात घेऊन येत्या पांच वर्षात देशांतर्गत उपभोगासाठी आपल्याला जवळ जवळ ५० ते ५५ लक्ष टन साखरेचे उत्पादन वाढवावे लागेल.

महाराष्ट्र हे साखर उत्पादनात देशातील एक अग्रेसर राज्य आहे. १९९४-९५ या वर्षात भारतात १४५ टन साखरेचे उत्पादन झाले. त्यामध्ये महाराष्ट्राचा वाटा ५०.२५ लक्ष टनाचा आहे. खालील तक्ता देशातील साखर उत्पादन व त्यामधील महाराष्ट्राचा वाटा दर्शवितो.

आधार

महाराष्ट्र राज्य साखर संघ वार्षिक अहवाल व वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट पुस्तिका.

या तक्त्यावरुन दिसून येते की, गेल्या पाच वर्षात देशातील एकूण साखर उत्पादनापैकी जवळ जवळ १/३ साखरेचे उत्पादन एकट्या महाराष्ट्र राज्यात झाले, त्यामुळे भविष्यात साखर उत्पादनामध्ये महाराष्ट्राला महत्त्वाचे स्थान राहणार आहे.

सन १९९४-९५ मध्ये महाराष्ट्रात सहकारी क्षेत्रातील १३८ साखर कारखान्यापैकी १०७ साखर कारखान्यानी साखरेचे उत्पादन केले, बाकी ३१ कारखाने या ना. त्या कारणाने बंद होते, या वर्षात साखर कारखान्यांनी

तक्ता क्र. १

वर्ष	भारत (लक्ष टन)	महाराष्ट्र (लक्ष टन)	महाराष्ट्राची टक्केवारी
१९९०-९१	१२०.४५	४०.१०	३३.२९
१९९१-९२	१३४.०५	४२.१३	३१.४३
१९९२-९३	१०६.००	३६.६०	३४.५३
१९९३-९४	९७.००	२६.९९	२७.८२
१९९४-९५	१४५.००	५०.२५	३४.६५
सरासरी			३२.३६

४५९.९४ लक्ष टन उसाचे गाळप करुन ५०.२५ लक्ष टन साखरेचे उत्पादन केले व भारतात पहिला क्रमांक मिळविला.

महाराष्ट्रात एकुण लागवडी-खालील क्षेत्रापैकी १३% क्षेत्र ओलिताखाली आहे. या एकूण सिंचित क्षेत्रापैकी १५% क्षेत्र उसाच्या लागवडी-खाली आहे. महाराष्ट्रात उत्पादीत होणाऱ्या उसापैकी ६६% उस साखर कारखान्यांकडे येतो. ३० % गुळ खांडसरी व इतर उद्योगात वापरला जातो. पुढील तक्ता १९९३-९४ या वर्षातील भारतातील इतर उस उत्पादक राज्ये व महाराष्ट्राची उस व साखर उत्पादनाची तौलनिक स्थिती दर्शवितो. त्यावरुन उस व साखर उद्योगातील महाराष्ट्राची कामगिरी लक्षात येते.

तक्ता नं. २ व ३ महाराष्ट्र, भारत व इतर उस उत्पादक राज्यांची उस व साखर उत्पादनाबाबतची तौलनिक स्थिती दर्शवितो. तक्ता नं. २ वरून दिसून येते की, उच्च लागण क्षेत्र, उसाचे उत्पादन व गाळप या बाबत १९९३-९४ या वर्षात महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर होता. तर उत्तर प्रदेशाचा पहिला क्रमांक होता. साखर उत्पादन व साखर उतारा याबाबत महाराष्ट्र पहिल्या स्थानावर होता. याचा अर्थ असा होतो की, साखर कारखान्याची संख्या उस लागवडीचे क्षेत्र, एकूण उस उत्पादन व उस गाळप या बाबत उत्तर प्रदेश महाराष्ट्राच्या पुढे असून देखील एकूण साखरेचे उत्पादन मात्र महाराष्ट्राने उत्तर प्रदेशापेक्षा जास्त केले हीच स्थिती साखर उताऱ्याबाबत दिसून येते. साखर उत्पादन व साखरेचा उतारा याबाबत उत्तरप्रदेश महाराष्ट्रांच्या मागे असल्याचे दिसून येते. म्हणजे महाराष्ट्रातील साखर

तक्ता क्र. ३

राज्ये	दर हेक्टरी उस उत्पादन (टन)	उस गाळप प्रमाण टक्के	दर टनी साखर उत्पादन
गुजराथ	७९.९३	७२.७३	११०.९९
कर्नाटक	८५.२४	३७.९८	१०४.७५
महाराष्ट्र	८१.०८	८८.५०	१११.२४
उत्तरप्रदेश	६०.११	२७.६५	९३.६५
भारत	६७.०५	४१.५४	१०४.२३

आधार महाराष्ट्र राज्य साखर कारखाना संघ वार्षिक अहवाल व इंडियन शुगर मे १९९४

तक्ता क्र. २

राज्ये	साखर कारखाने (०००हे)	उस लागण क्षेत्र (००० टन)	उस उत्पादन (०००टन)	उस गाळप (०००टन)	साखर उत्पादन (०००टन)	साखर उतारा	गळीत हंगाम सरासरी दिवस
गुजराथ	१४	१२८	१०२३२	७४४२	८२६	११.०९	१४९
कर्नाटक	२८	२४५	२०८८४	७९३३	८३१	१०.४८	१२७
महाराष्ट्र	९७	३४४	२७८९२	२४६८५	२७४६	११.१३	१०९
उत्तर प्रदेश	१०९	१७४४	१०४८३९	२८९८९	२७१५	९.३७	११३
भारत	३९४	३३८६	२२७०५९	९४३३८	९८३३	१०.००	११४

आधार: को-ऑपरेटीव्ह शुगर मे १९९५

कारखानदारी गुणात्मकदृष्ट्या व कार्यक्षमतेच्या दृष्टीने उत्तर प्रदेशापेक्षा सरस आहे.

तक्ता क्र. ३ विविध राज्यांचे दर हे उस उत्पादन, उस गाळप प्रमाण व उसापासून प्रती टन उत्पादित केली जाणारी साखर दर्शवितो. १९९३-९४ या वर्षात दर हेक्टरी उस उत्पादनाबाबत देशात महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर तर कर्नाटक पहिल्या स्थानावर होता, तसेच एकूण उत्पादित उसापैकी ८८.५० उसाचे गाळप करुन व उसाच्या प्रत्येक टनापासून १११.२४ कि. ग्रॅ. साखर उत्पादीत करुन महाराष्ट्राने देशात पहिला क्रमांक मिळविल्याचे दिसून येते. वरील तक्त्यावरुन दिसून येते की, महाराष्ट्राची उस व साखर उत्पादनाच्या क्षेत्रातील कामगिरी इतर राज्यांच्या तुलनेत अधिक कार्यक्षम व गुणात्मकदृष्ट्या सरस आहे. म्हणून महाराष्ट्र साखर कारखानदारीच्या क्षेत्रात देशातील अग्रेसर राज्य ठरते.

महाराष्ट्राने साखर उद्योगात भरीव कामगिरी करुन देशात निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले आहे. महाराष्ट्रातील साखर उद्योग ग्रामीण रोजगार निर्मितीमध्ये देखील अग्रेसर राहिला आहे. एक सहकारी उद्योग अप्रत्यक्षपणे देखिल रोजगार पुरवितो. उपपदार्थ निर्मिती पशुखाद्य, डेअरी, कुक्कुट पालन विभाग, कारखान्यांच्या पाणी-पुरवठा योजना, मळी, कागद, ॲसिटोन प्रकल्प, कारखान्यांच्या बँका, इत्यादी मार्फत लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत.

महाराष्ट्रातील साखर उद्योग केंद्र व राज्य सरकारांना विविध करांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात महसूल मिळवून देतो. उत्पादनकर, उस खरेदी कर, उपपदार्थावरील विक्रिकर, उत्पन्नकर शिक्षण कर, पाणीपट्टी, मुख्यमंत्री निधी, आपत्ती कालीन निधी वगैरे मार्गानी हा उद्योग केंद्र व राज्य सरकारला कोट्यावधी रु. उत्पन्न मिळवून देतो. १९९४-९५ या वर्षात महाराष्ट्रातील साखर उद्योगाने केंद्र सरकारला उपपदार्थावरील कर रुपाने ३७०.७५ को. रु. दिले तर महाराष्ट्र सरकारला १५१६.२७ कोटी दिले. १ लक्ष टन उसाच्या गाळपापासून केंद्र व राज्य सरकारला विविध करापोटी ३२६.३८ लक्ष रु. मिळतात. केंद्र सरकार खुल्या साखर विक्रीसाठी १ पोत्याला ८५ रु. व लेव्ही साखर विक्रीवर १ पोत्याला ५२ रु. उत्पादन कर आकारते. तर राज्य सरकार उस खरेदी कर दर टनाला २५रु. मुख्यमंत्री निधी दर टनाला १ रु. प्रमाणे उस उत्पादकाकडून कर गोळा करते. याचाच अर्थ महाराष्ट्रातील साखर उद्योग केंद्र व राज्य सरकारच्या उत्पन्न वाढीत भरीव कामगिरी करीत आहे.

अशा प्रकारचा महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला चालना देणारा, रोजगाराभिमूख असणारा, केंद्र व राज्य सरकारांना चांगले उत्पन्न मिळवून देणारा व देशात अग्रेसर असणारा महाराष्ट्रातील साखर उद्योग व उस शेतकरी आज आर्थिक दुष्ट चक्रात सापडला आहे. उसाला योग्य भाव मिळावेत म्हणून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी आंदोलन सुरु करून आज ते रस्त्यावर आले आहेत. या परिस्थितीला केंद्र व राज्य सरकार, साखर कारखानदार तसेच उस कामगार वगैरे घटक जबाबदार आहेत. शेतकऱ्यांनी उसाचे भाव वाढवून मागितले आहेत. काहीं ठिकाणी १०००रु प्रती टन तर काही भागात १२०० रु. प्रती टन उसाच्या भावाची मागणी होत आहे. म्हणजे सरासरीने १००० रु. प्रती टन उसाला भाव मिळावा ही आज शेतकऱ्यांची मागणी आहे. आजची महागाई, राहणीमान खर्च, मजूरीचे दर, खतांचे दर, पाणीपट्टी, वीजबील, शेतसारा इत्यादीतील वाढ लक्षात घेतली तर शेतकऱ्यांची मागणी रास्त आहे, व ती मान्य झालीच पाहिजे. शेतकऱ्यांची ही मागणी रास्त कशी आहे, हे शेतकरी उस उत्पादनासाठी जे विविध घटक (इन पुटस्) वापरतात त्यांच्या किंमतीवरुन स्पष्ट होते.

खतांचे दर

या तक्त्यावरून दिसून येते की युरियाच्या किंमती गेल्या दोन वर्षात २२.२२% ने वाढल्या पोटॅशच्या २१.०५% ने तर सुपर फॉस्फेटच्या किमती २६.६६% ने वाढल्या. प्रत्यक्षात गेल्या दोन वर्षात पेरणी हंगामात खतांचा तुटवडा निर्माण होऊन शेतकऱ्यांना वरील अधिकृत किमतीपेक्षा अनअधिकृतपणे जास्त किमती द्याव्या लागल्या आहेत.

मजूरीचे दर

गेल्या दोन वर्षात शेत मजूरांचे

तक्ता क्र. ४

खताचा प्रकार	१९९२-९३ (प्रती पोती)	१९९३-९४ (प्रती पोते)	१९९४-९५ (प्रती पोते)	१९९२-९३ पेक्षा १९९४-९५ मधील वाढ
युरिया	१३५	१६५	१६५	२२.२२ %
पोटॅश	१९०	१८३	२३०	२१.०५ %
सुपर फॉस्फेट	१२०	१२६	१५२	२६.६६ %
सरासरी वाढ				२३.३१ %

आधार : खत व्यापारी व सहकारी साखर कारखाना अहवाल.

दररोजच्या मजूरीचे दर २५ रुपयावरुन ३५ रु. पर्यंत वाढले, मजूरीच्या दरातील ही वाढ ४०% आहे. शेत मजूरांना वरील दरापेक्षा जास्त मजूरी द्यावी लागते. उसाच्या उत्पादन खर्चात प्रामुख्याने खते व मजूरीचा समावेश होतो. खतांच्या किंमती सरासरी २३.३१% ने तर मजूरीचे दर ४०% ने वाढले याचा अर्थ गेल्या दोन वर्षात खाते व मजूरीच्या दरात सरासरी २३.३१ = ४० ६३.३१/२ = ३१.६५% ने वाढ झाली आहे.

उस तोडणी व वाहतूक खर्चात देखील वाढ झाली आहे.

मराठवाडा विभागातील तेरणा सह. साखर कारखान्याचा हा खर्च गेल्या पाच वर्षात ६८.२४% ने वाढला, तर कोल्हापूर विभागातील कारखान्यांचा हा खर्च ६८.४८ % ने वाढला. म्हणजे गेल्या पाच वर्षात हा खर्च सरासरी ६८ पेक्षा जास्त वाढला तर सहकारी साखर कारखानदारीतील तज्ञांच्या मते १९९३-९४ पेक्षा १९९४-९५ मध्ये हा खर्च प्रतीटन ७० रु. ने वाढला. महाराष्ट्र सरकारने देखिल अलिकडे शेतजमीनीवरील शेतसाऱ्यात ७ पट म्हणजे टक्केवारीच्या भाषेत ७००% ने वाढ केली आहे. खतांचे दर मजूरीचे दर, उस तोडणी व वाहतूक खर्चातील वाढीचा विचार करता शेतकऱ्यांचे उसाचे भाव मात्र गेल्या वर्षाच्या तुलनेत वाढण्या ऐवजी प्रतीला १५० ते २०० रु. नी कमी झाले आहेत. वरील घटकातील वाढीचा विचार करता शेतकऱ्यांची उस दर वाढीची मागणी समर्थनीय ठरते. उस

तक्ता क्र. ६

उस तोडणी व वाहतूक खर्च (रु.)

	१९९२-९३	१९९३-९४	१९९४-९५
तेरणा शेतकरी सह. साखर कारखाना लि. ढोकी उस्मानाबाद	७३.३८	१२३.४६	६८.२४
	१९८८-८९	१९९४-९५	
कोल्हापूर विभाग	६५.२३	१०९.९०	६८.४८३
सरासरी वाढ			

आधार : तेरणा शेतकरी सह. साखर कारखाना लि. वार्षिक अहवाल १९९३-९४ व उसाच्या किमतीचा घोळ - डॉ. जुगळे

उत्पादकांच्या उस भाव वाढीच्या मागणीचे विश्लेषण उसाच्या उत्पादन खर्चावरूनदेखील करता येते. अर्थशास्त्राच्या नियमानुसार वस्तूचा उत्पादन खर्च वाढला की किंमत देखील वाढते. शेती आदानांच्या (इनपुटस्) किमतीत वाढ झाली की उत्पादनाच्या (आउटपुटस्) किमती वाढणे अपरिहार्य असते. कोणत्याही उद्योगाला त्याच्या उत्पादन खर्चपेक्षा अधिक किमत मिळाली तरच तो उद्योग दिर्घ काळात चालू ठेवता येतो अन्यथा तो बंद करावा लागतो, हाच नियम साखर उद्योगाला देखील लागू पडतो.

शेती उत्पादन खर्च कसा मोजावा या बाबत तज्ञांमध्ये मतभेद आहेत, परंतु शेतमालाचा उत्पादन खर्च मोजण्यासाठी केंद्रीय कृषी आयोगाच्या सेन समितीने काही निकष सांगितले होते, त्यामध्ये १९८१-८२ मध्ये किरकोळ बदल करुन शेतमाल उत्पादन-खर्च मोजण्यासाठी पुढील निकष निर्धारीत करण्यात आले.

१) शेतकऱ्यांचा प्रत्यक्ष पैसा व वस्तूरूपी खर्च, २) जमिनीचा खंड, ३) जमीन महसूल + स्थिर भांडवलावरचे व्याज, ४) कौटुंबिक श्रमाचे मूल्य.

त्या बरोबरच केंद्रीय कृषी किमंत आयोगाने ३१ महत्त्वाचे निकष सांगितले आहेत. त्याआधारे उसाचा उत्पादन खर्च काढता येतो. उसाचा उत्पादन खर्च दोन प्रकारचा असतो. १)नवीन उस लागणीचा खर्च, २) खोडवा उसाचा खर्च.

महाराष्ट्राची गेल्या तीन वर्षातील दर एकरी उस उत्पादनाची सरासरी ३१.६५ टन आहे. मराठवाड्यातील तेरणा व अंबाजोगाई सह. साखर कारखान्यांच्या क्षेत्रातील सरासरी दर एकरी उत्पादन गेल्या तीन वर्षात २२ टनापेक्षा थोडेसे जास्त आहे. महाराष्ट्राची गेल्या तीन वर्षातील उस उत्पादनाची सरासरी प्रमाण मानली तर शेतकऱ्याला दर टनी उसाचा उत्पादन खर्च, पुढील प्रमाणे काढता येतो.

दर एकरी उत्पादन खर्च / दर एकरी उत्पादन

२१८९२.६०/३१.६५

६९१.७० रु. येतो

मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी

तक्ता क्र. ५

शेतमजूर	१९९२-९३	१९९३-९४	१९९४-९५	१९९२-९३ पेक्षा १९९४-९५ मधील वाढ
दर रोजचा मजूरीचा दर (रु)	२५.००	३०.००	३५.००	४०%

१) नवीन उस लागणीसाठी दर एकरी उ. खर्च पुढील प्रमाणे येतो.

	रुपये	रुपये
१) जमीन १ एकर—किमत १,००,००० रुपयावर १३ दराने खंड		
२) जमीन नांगरणे २ वेळा (उभी-आडवी) दर एकरी ६५० रु. प्रमाणे -		
३) जमीन मोगडणे/खुरटणे/फनणे—दर एकरी ३०० रु.		
४) ढेकळे फोडणे		१००.००
५) जमीन कुळवणे		२००.००
६) जमीनीतील गवत व काड्या वेचणे		१००.००
७) रान घोळणे, सरी सोडणे, सरी उजरणे व वाफे तयार करणे वगैरे		५००.००
८) शेणखत एकरी २० गाड्या (एक गाडी १५० रु. प्रमाणे)		
९) उस बियाणे— दर एकरी २.५ टनाप्रमाणे, दर रु. १००० टन		२५००.००
१०) उस बियाणे तोडणे, सोलणे, तुकडे करणे, मांडणे व लावणे		
११) किटक नाशके		१००.००
१२) उस भांगलणे/खुरपणे २ वेळा, एकरी रु. ७५० प्रमाणे		१५००.००
१३) दंड व पाट दुरुस्ती, उस बांधणे		२००.००
१४) रासायनिक खते		४२३१.२५
१५) सुपर फॉस्फेट ५ पोते रु. १५२/ पोते प्रमाणे	७६०.००	
युरिया ५ पोते रु. १६५/पोते प्रमाणे	८२४.००	
पोटॅश ५ पोते रु. २३०/ पोते प्रमाणे	१११५.००	
मिश्र खते सुफला ५ पोते रु. ०६.२५/ पोते प्रमाणे	१५३१.२५	४२३१.२५
१५) कानी काढणे,*गोळा करणे व जाळणे		१००.००
१६) पाणी पट्टी सरकारी कॅनाल दर एकरी ९०० प्रमाणे		९००.००
१७) वीज बील		
५ एच. पी. मोटार ५ एकराला वर्षभर पाणी पुरविते त्यासाठी १५०० रु		
वीज बील आकारले जाते त्याप्रमाणे १ एकरासाठी		
१८) उसाला पाणी पाजणे		
१ वर्षात २४ वेळा पाणी दिले तर १ वेळा १ एकराला पाणी पाजण्यासाठी		
२ गडी याप्रमाणे ४८ गडी, गड्याला रोज ४० रु. मजुरी प्रमाणे ४८ x४०		१९२०.००
१९) शेतसारा व इतर कर		२००.००
२०) वीज पंप दुरुस्ती, पाईप दुरुस्ती व इतर अनुषंगीक खर्च		
२१) विद्युत मोटारव पाईप लाईन या भांडवली खर्चावरील व्याज.		
हा खर्च २५००० रु. गृहीत घरला आहे. तो कमी/जास्त असू शकतो.		
या २५००० रु. भांडवली खर्चावरील १२% प्रमाणे व्याज		
२२) शेतकऱ्यांची देखरेख व व्यवस्थापन किंवा कौटुंबिक श्रमाचे मूल्य		२०००.००
२३) शेतकरी सह. पत संस्थेचे कर्ज काढून हा खर्च करीत असतो.		
त्यामुळे या कर्जावरील ९% दराने व्याज		१६४२.६०
(यामध्ये १८,२५१.२५ रु. एकूण पतसंस्थेचे कर्ज गृहीत घरले आहे.भांडवली खर्चावरील		
व्याज + जमीनीचा खंड+ शेतकऱ्यांची देखरेख/ कौटुंबीक श्रमाचे मूल्य यांचा रु. ६०००		
खर्च समाविष्ट नाही.)		
एकूण खर्च		२५,७९३.८५

२) खोडवा उसाचा खर्च (दर एकरी)

१) जमीन १ एकर किंमत १००००० रु. १ % दराने खंड	
२) उस तुटुन गेल्यानंतर कांड्या, वाढे वेचणे, गोळा करणे	
३) खोडक्या तोडणे (उंच राहिलेले बुडके तोडणे)	१५०.००
४) पाला गोळा करुन जाळणे	१००.००
५) नांगराने सरी फोडणे	३००.००
६) दोन वेळा सरी कुळवणे	२००.००
७) वाफे तयार करणे	५००.००
८) रासायनिक खते (२० पोते)	४२३१.२५
९) उस खुरपणे भांगलणे २ वेळा	१५००.००
१०) उसाला पाणी पाजणे	१९२०.००
११) पाणी पट्टी	९००.००
१२) दंड व पाट दुरुस्ती, उस बांधणे	२००.००
१३) वीज बील	३००.००
१४) शेतसारा व इतर कर	२००.००
१५) वीज पंप, पाईप लाईन दुरुस्ती व इतर खर्च	२००.००
१६) कानी काढणे व गोळा करुन जाळणे	१००.००
१७) वीज व पाईप लाईन या भांडवली गुंतवणूकीवरील व्याज	३००.००
१८) शेतकऱ्याच्या कौटुंबीक श्रमाचे मूल्य देखरेख, व्यवस्थापन वगैर	२०००.००
१९) सह. पतसंस्था/बँकाच्या कर्जाचे व्याज ९% दराने	९९०.१०
एकूण खर्च	१७९९१.३५

अशा प्रकारे नवीन उस लागणीसाठी व खोडवा उसासाठी खर्च केल्यास नवीन उसाला एकरी ४० टन व खोडव्याला २४-२५ टन उत्पादन निघू शकते.

एकुण सरासरी उत्पादन खर्च = नवीन उस लागणीचा + खोडवा उसाचा

उ. खर्च + उ. खर्च

२५७९३.८५ + १७९९१.३५

४३७८५.२०/२ = २१८९२.६०

आजच्या काळात दर एकरी शेतकऱ्याला उसासाठी २१८९२.६० रु. खर्च येतो.

दर एकरी उसाचे = नवीन उस लागणीचे + खोडवा उसाचे

सरासरी उत्पादन = दर एकरी उत्पादन दर एकरी उत्पादन

= ४० टन + २४ टन

= ६४/ 2= ३२ टन

दर एकरी उसाचे सरासरी ३२ टन उत्पादन निघते.

गेल्या तीन वर्षातील महाराष्ट्रातील सरासरी दर एकरी उत्पादन

हा खर्च ९९५.११ रु. येतो. या ठिकाणी संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चाचा विचार करु. माझ्या मते महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आज उसाचा उत्पादन खर्च दर टनी कमीत कमी ६९१.७० रु. येतो. या उत्पादन खर्चात

तक्ता क्र. ७

वर्ष	दर हेक्टरी सरासरी उस उत्पादन (मे. टन)
१९९१-९२	७९.८३
१९९२-९३	७६.४१
१९९३-९४	८१.१५
सरासरी दर हेक्टरी	$\frac{२३७.३९}{३}$ = 79.13
दर एकरी सरासरी	$\frac{७९.१३}{३}$ = 31.65

स्थान परत्वे व परिस्थितीनूसार फरक पडू शकतो. डॉ. जुगळेंच्या अभ्यासानूसार हा खर्च ७८१.३३ रु. येतो, तर प्रा. मोहिते व तुपे यांच्या अभ्यासानुसार हा खर्च दर टनी ७५० रु. येतो. शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारीत भाव मिळालेच पाहिजेत. शेतकऱ्यांना इतर उद्योगाप्रमाणे उसाच्या किमती मिळाव्यात. त्यामध्ये उत्पादन खर्च + नफा + प्रेरणादायक/ प्रलोभन किंमत समाविष्ट करुन उसाचे भाव द्यावेत. त्यांचे दर उ. खर्चाच्या २०% नफा, १०% महागाई व १०% प्रलोभन किंमत असे आवेत. यावरून उसाचा भाव पुढील प्रमाणे काढावा.

उत्पादन खर्च + नफा + महागाई + प्रलोभन किंमत

६९१.७० + २० % + १० % + १०% ६१९.७०+१३८.३४+ ६९.१७ + ६९.१७ = ९६८.३८ रु. प्रती टन. या सुत्रावरुन उसाचा भाव प्रतीटन ९६८.३८ रु. येतो. याचाच अर्थ शेतकऱ्यांचा दर टनाला १००० रु. उसाच्या भावाची मागणी अवाजवी किंवा अयोग्य नाही. शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारीत उसाला भाव मिळालाच पाहिजे.

उस भाव निश्चिती प्रक्रिया : शेतकऱ्यांच्या उसाचे भाव हे प्रामुख्याने केंद्र व राज्य सरकारच्या धोरणावर अवलंबून असतात. केंद्र सरकारचा कृषी किंमत आयोग आपल्या निकषानुसार उसाची किमान किंमत ठरवितो व ती केंद्र सरकार जाहीर करते. महाराष्ट्रात राज्य सरकार ही किंमत ठरविते. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली असणारी मंत्री समिती वेगवेगळ्या कारखान्यांचे उसाचे दर ठरविते. त्यासाठी कारखान्याचे एकूण गळीत, साखर उत्पादन, साखर उतारा, कारखान्याचा एकूण खर्च, कारखान्याची आर्थिक परिस्थिती हे घटक विचारात घेऊन उसाचा भाव ठरविला जातो. त्या अगोदर सर्व साखर कारखान्याना साखर संचालकाकडे आपल्या उत्पन्न व खर्चाचा तपशील पाठवावा लागतो. साखर संचालक हा सर्व तपशील मंत्री समितीपुढे ठेवतो व त्यावरुन मंत्री समिती उसाचा भाव निश्चित करते. वेगवेगळ्या कारखान्यांसाठी हे भाव वेगवेगळे असतात. उसाच्या भावाचा पहिला हप्ता सर्व शेतकऱ्यांना सारखा दिला जातो. त्यानंतर कारखान्याच्या आर्थिक कुवतीनूसार अंतीम भावात फरक पडतो. राज्य सरकारच्या मंत्री समितीत ठरवून दिलेले भाव सर्व कारखान्याना बंधनकारक असातात. उसाचा भाव पुर्णत: साखर कारखान्यांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून नाही तर राज्य व केंद्र सराकारच्या धोरणावर अवलंबून आहे. साखर विक्रितून येणाऱ्या पैशाच्या उत्पन्ना आधारे किती दर द्यायचा ते निश्चित करतात, म्हणजे अगोदर साखर विक्री केली जाते. व नंतर उसाचा भाव ठरविला जातो. अशा प्रकारे वस्तूंचे भाव निश्चित करण्याची प्रक्रिया कोणत्याही उद्योगात आढळून येत नाही.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची उस भाववाढीची मागणी कशी न्याय्य आहे व उस भाव निश्चितीची प्रक्रिया पाहिल्यानंतर शेतकऱ्यांच्या उसाला वाढीव भाव देण्यात कोणते अडसर आहेत ते पाहू. या बाबत केंद्र व राज्य सरकारची धोरणे, कारखानदार व उस कामगार यांचा विचार केला पाहिजे. उस दर निश्चितीमध्ये केंद्र व राज्य सरकारची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. केंद्र सरकारचे साखर विक्रीबाबतचे धोरण दोन प्रकारचे आहे. साखर कारखान्यांना त्यांनी उत्पादीत केलेली साखर ६०:४० या सुत्रानूसार विकावी लागते. म्हणजे साखर कारखान्याना ६०% साखर खुल्या बाजारात प्रचलीत किमतीना विकता येते तर ४०% साखर लेव्ही म्हणून कमी दराने विकावी लागते. साखर विक्रीच्या या दोन किमतीमध्ये २५० ते ३०० रु. दर क्विंटलला फरक पडतो. लेव्ही साखरेला दर क्विंटलला २५० ते ३०० रु. कमी पडतात. त्यामुळे साखर कारखान्याना तोटा होतो, त्याचा परिणाम उस उत्पादक शेतकऱ्यांना कमी भाव मिळण्यात होतो. शिवाय केंद्र सरकार खुल्या साखर विक्रिवर दर पोत्याला ८५ रु. व लेव्ही साखरेला दर पोत्याला ५२ रु. उत्पादन कर आकारते. सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातून गरिबाना स्वस्तात साखर मिळणे न्याय्य ठरते. परंतु गरीबांना स्वस्तात साखर पुरविणे ही जबाबदारी सरकारची आहे. ती शेकऱ्यांची नाही. भारतातील बहूसंख्य उस उत्पादक शेतकरी गरीब आहेत त्यामुळे लेव्ही साखरेचा भूर्दंड शेतकऱ्यांवर बसविणे अन्याय्य आहे,

त्यासाठी केंद्र सरकारने खुली साखर व लेव्ही साखरेच्या किमतीतील फरकाची रक्कम साखर कारखान्यांना द्यावी म्हणजे साखर कारखाने शेतकऱ्यांच्या उसाला जादा भाव देऊ शकतील.

केंद्र सरकारची साखर कोटा पद्धती देखील साखर कारखाने व शेतकऱ्याना योग्य नाही. या पद्धतीनुसार केंद्र सरकार प्रत्येक साखर कारखान्याने दर महिन्याला किती साखर विकावी याचा कोटा ठरवून देते, त्यानूसार कारखाने साखरेची विक्री करतात. याचा अर्थ जोपर्यंत केंद्र सरकार कारखान्यांना साखरविक्रीचा आदेश देत नाही तो पर्यंत साखर कारखान्यांना आपली साखर गोदामामध्ये साठवून ठेवावी लागते, त्यांनी गुंतविलेले पैसे अडकून पडतात, बँकांच्या व्याजाचा भूर्दंड साखर कारखान्याना सोसावा लागतो, त्याबरोबरच बाजारात चांगले भाव असल्यास साखरेची विक्री करुन त्याचा फायदा त्यांना घेता येत नाही व गुंतविलेले पैसे मोकळे करुन घेता येत नाहीत. या पद्धतीमुळे साखर कारखान्याना वर्षभर थोडी थोडी साखर विकावी लागत असल्याने त्यांचे पैसे अडकून पडतात व त्यावर बँकांचे व्याज भरावे लागते. केंद्र सरकारच्या या धोरणामुळे महाराष्ट्रातील साखर कारखान्यांकडे १५ लक्ष टन साखर गोदामात पडून आहे. त्यामुळे राज्यातील साखर कारखान्यांकडे राज्य सहकारी बँकेचे १६४५ को. रु. व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे ४०० को. रु. असे २००० को. रु. अडकून पडले आहेत. एकट्या कोल्हापूर जिल्ह्यातील ७ साखर कारखान्यांची १४ को. रु. किमतीची साखर पडून आहे. राज्य सहकारी बँकेचे पैसे अडकून पडल्याने साखर कारखान्याना देण्यासाठी आज या बँकेकडे पैसे नाहीत, भरीस भर म्हणून राज्य सरकाराने नाबार्डला सहकारी साखर कारखान्यांच्या संदर्भात हमी न दिल्यामुळे नाबार्डकडून राज्य सहकारी बँकेला पैसे मिळाले नाहीत. परिणामी, राज्य सह. बँक, जिल्हा मध्यवर्ती सह. बँका व सह. साखर कारखाने आर्थिक कोंडीत सापडले आहेत, त्यामुळे साखर कारखान्यानी गेल्या हंगामातील उसाच्या अंतीम बिलाचे पैसे व या वर्षाच्या पहिल्या उसबिलाचे पैसे शेतकऱ्यांना अद्याप दिलेले नाहीत. म्हणून केंद्र सरकारने साखर विक्रीची प्रचलीत कोटा पध्दती बदलली पाहिजे. त्यासाठी केंद्र सरकारने साखरेच्या मागणी पुरवठ्यानुसार साखरेचा शिलकी साठा (बफर स्टॉक) निर्माण करावा, तो १५ लक्ष टनाचा असावा अशी मागणी होत आहे, तेवढी साखर केंद्र सरकारने खरेदी करुन साखर कारखान्यांना पैसे द्यावेत म्हणजे साखर कारखान्यांना आर्थिक कोंडीतून बाहेर पडण्यास मदत होईल. या सर्व बाबी विचारात घेऊन साखरेबाबत केंद्र सराकारने दिर्घकालीन धोरण आखावे. त्यामध्ये साखरेच्या निर्यातीचा समावेश करावा. केंद्र सरकारने साखर निर्यातीला परवानगी देऊन अतिरिक्त साखर उत्पादनाची समस्या दूर करावी व साखरेला व पर्यायाने उसाला योग्य भाव मिळवून देण्यास मदत करावी.

केंद्र सरकारची लेव्ही साखरेच्या दराबाबतची झोन पद्धती देखील महाराष्ट्रावर अन्याय करणारी आहे. या पद्धतीनुसार उत्तर प्रदेश व बिहार मधील लेव्ही साखरेला ज्यादा दर मिळतो (९४२ रु. क्विं.), तर महाराष्ट्राला दर क्विंटलला १३८ रु. कमी मिळतात. केंद्र सरकारने सर्व राज्यांसाठी हा दर सारखा ठेवल्यास महाराष्ट्रातील साखर कारखान्याना १३८ रु. क्विंटलला जास्त मिळतील त्यामुळे ते शेतकऱ्यांना वाढीव भाव देऊ शकतील.

सहकारी साखर कारखान्यांबाबत राज्य सरकारची भूमिका देखील महत्वाची आहे. राज्य सरकार साखर कारखान्याकडून प्रती टन २५ रु. प्रमाणे उस खरेदी कर (परचेस टॅक्स) वसूल करते. सहकारात शेतकरी हा सहकारी संस्थेचा मालक असतो. तो मालक या नात्याने आपला उस स्वत:च्याच कारखान्याला गळीतासाठी देत असतो, या व्यवहारात स्वत:चा उस आपल्याच कारखान्यासाठी वापरत असताना त्यावर उस खरेदीकर बसविणे योग्य व न्याय्य ठरते काय? समजा साखर कारखाना उसाची खरेदी करतो असे गृहीत धरले तर त्या खरेदी मालाचे इतर वस्तू प्रमाणे ताबडतोब पैसे का दिले जात नाहीत? याचा अर्थ असा होतो की सभासद शेतकरी सहकारी कारखान्याचा मालक असल्यामुळे उसाची साखर तयार करुन साखरेची विक्री केल्यानंतर आपल्या उसाचे पैसे घेत असतो. या पार्श्वभूमीवर उस खरेदी कर योग्य ठरत नाही. राज्य सरकारने हा कर रद्द करुन, त्या कराची रक्कम शेतकऱ्यांना आधिक भाव देण्यासाठी वर्ग करावी म्हणजे शेकऱ्यांना प्रती टन २५ रु. भाव वाढून मिळतील.

राज्य सरकार साखर कारखान्यांना शेतकऱ्यांच्या उस बिलातून मुख्यमंत्री निधी प्रतीटन १ रु., ऊस विकास निधी दर टनाला ४ रु., भाग विकास निधी ३% प्रमाणे २१ रु. प्रती टन, अल्पबचत १ रु. प्रती टन, पूर दुष्काळ, भूकंप बेघर निधी यासाठी प्रती टन ५० पैशापासून ते ३ रु. पर्यंत कपाती करण्यास परवानगी देते. या कपातीपैकी उस विकास निधी कारखान्यांच्या कार्यक्षेत्रात उस संशोधन व विकास यासाठी वापरला जात असल्याने त्याचा शेतकऱ्यांना फायदा मिळतो, परंतु भाग विकास निधी मात्र टिकेचे लक्ष्य ठरतो. साखर कारखान्यानी आपल्या भागात रस्ते, पाणी, शिक्षण, आरोग्य वगैरे सोयींच्या विकासासाठी हा निधी वापरावा अशी अपेक्षा असते. काही कारखान्यांचा अपवाद वगळता किती कारखान्यानी आपल्या भागात या

निधीतून लोकांना सोयी उपलब्ध करुन दिल्या आहेत त्याचे सर्वेक्षण ध्यावे म्हणजे या निधीचा वापर कशासाठी होतो हे कळून येईल. राज्याच्या विविध भागात मूलभूत सोयी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ही राज्य सरकारची आहे, व त्यामधून भ्रष्टाचाराला वाव मिळतो. राज्य सरकारने हा निधी रद्द केल्यास शेतकऱ्यांना प्रती टन ८ ते २१ रु. जादा मिळतील.

तसेच मुख्यमंत्री निधी, अल्पबचत, पुर, दुष्काळ, बेघर निधी, व इतर निधींची रक्कम प्रती टन ५ रु. पर्यंत जाते व ती दरवर्षी सक्तीने शेतकऱ्यांच्या उस बिलातून कापून घेतली जाते. या रकमेचा प्रत्यक्ष भार शेतकऱ्यांवर पडतो. अशा प्रकारच्या कपाती, व्यापारी, नोकरदार, किंवा इतर कोणाकडून ही कापून घेतल्या जात नसताना उस उत्पादक शेतकऱ्यांच्या बाबतीतच हा दुजाभाव कश्यासाठी असावा? बहुसंख्य उस उत्पादक शेतकऱ्यांना आपल्या नांवे दरवर्षी अल्पबचतीची रक्कम कापून जाते हे माहितच नसते, त्यामुळे मुदत पूर्तीनंतर अल्पबचतीची रक्कम परत मागण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मुदतपूर्तीनंतर महाराष्ट्रातील किती साखर कारखान्यांनी या रकमा शेतकऱ्यांना परत केल्या आहेत ते पडताळून पहावे. या कपाती रद्द झाल्या पाहिजेत.

उस उत्पादन निसर्गाच्या लहरीवर अवलंबून आहे. चांगले पाऊसपाणी व हवामान असल्यास अतिरिक्त उसाची समस्या निर्माण होते तर कमी पाऊस झाल्यास उसाची टंचाई निर्माण होते, परिणामी उसाच्या भावात तेजी मंदी येत असते. महाराष्ट्रात १९९०-९१ व १९९४-९५ या वर्षात अतिरिक्त उसाची समस्या निर्माण होऊन सर्व उसाचे गाळप होऊ शकले नाही, त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. उसाच्या भावातील तेजी मंदी कमी करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने मिळून उस भाव स्थिरीकरण निधी उभारावा. या निधीत दरवर्षी विशिष्ट रकमेची भर घालावी, या निधीतून साखर कारखान्यांना आपत्ती काळात कर्जे व मदत देऊन साखर उद्योगावरील आर्थिक आपत्तीचे निवारण करावे.

आजच्या काळातील बहुचर्चित व राज्य सरकारच्या अखत्यारीतील प्रश्न म्हणजे उसाची झोन बंदी होय. काहींच्या मते उसाची झोन बंदी उठवावी म्हणजे शेतकऱ्यांना चांगले भाव मिळतील, तर काहींचा झोन बंदी उठविण्याला विरोध आहे. उस झोन बंदी समर्थकांच्या मते उसाची झोन बंदी उठविल्यास चांगले भाव देणाऱ्या कारखान्याला भरपूर उस मिळेल तर कमी भाव देणाऱ्या कारखान्यांना उस मिळणार नाही त्यामुळे काही कारखान्यांसमोर अतिरिक्त उसाची तर काही कारकान्यासमोर टंचाईची समस्या निर्माण होऊन सर्व साखर कारखान्यांचे नियोजन कोसळेल साखर कारखान्यात उस मिळविण्याची स्पर्धा लागेल, अतिरिक्त उस उत्पादन काळात शेतकऱ्यांच्या उसाला कोणी वाली असणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होईल. झोन बंदी बाबतचे हे समर्थन बऱ्याच अंशी खरे असेल तरी उस झोन बंदीमुळे कांही भागात शेतकऱ्यांची पिळवणूक व नुकसान होत आहे. महाराष्ट्रात काही साखर कारखाने नेहमीच अकार्यक्षम व्यवस्थापन नियोजनाचा अभाव वगैरे कारणामुळे सतत तोट्यात आहेत. या कारखान्यानी शेतकऱ्यांना कधीही चांगले भाव दिलेले नाहीत. त्यांनी आपल्या कार्यक्षत्रातील संपूर्ण उसाचे गाळप केलेले नाही व तेवढे गाळप करण्याची क्षमता त्यांच्याकडे नाही, या कारखान्यांच्या कार्यक्षेत्रात नेहमीच अतिरिक्त वाटप बाहेरच्या दुसऱ्या कारखान्यांना करतात, त्यासाठी ते बाहेरच्या कारखान्यांकडून उसाला जादा भाव घेतात, तेवढा भाव ते कारखाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना देत नाहीत. थोडक्यात दलालीचा व्यवसाय करून दलालीची सर्व रक्कम ऊस उत्पादकांना दिली जात नाही. उदा. मराठवाड्यातील काही साखर कारखाने नगर जिल्ह्यातील कारखान्यांना आपल्या क्षेत्रातील अतिरिक्त ऊस ज्यादा भावाने देतात. जेवढा भाव मराठवाड्यातील साखर कारखाने नगर जिल्ह्यातील किंवा इतर कारखान्यांकडून घेतात तेवढे पैसे शेतकऱ्यांना दिले जात नाहीत या प्रकारची उस दलाली करणे साखर कारखान्यांना उसाच्या झोनबंदीमुळे शक्य होते. या परिस्थितीत उस झोन बंदी समर्थनीय आहे काय ?

आज ऊसाचा उत्पादन खर्च टनी ७०० रु. चे आसपास येतो. तर मराठवाड्यातील अंबाजोगाई साखर कारखान्याने गेल्या वर्षाच्या उसाला ४६० रु. पहिला हप्ता दिला आहे, त्याने तर अद्याप काहीच पैसे दिलेले नाहीत. मा. उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांच्या म्हणण्यानुसार या कारखान्याचा गतवर्षीचा भाव टनाला २६० रु. निघाला. शेतकऱ्यांच्या हितासाठी राज्य सरकारने कारखान्याला प्रतीटन २०० रु. कर्ज दिल्यामुळे हा कारखाना ४६० रु. भाव देऊ शकला. तसेच परभणी जिल्ह्यातील मराठवाडा सहकारी साखर कारखान्याने गतवर्षीच्या ऊसाचा अंतीम भाव ४६० रु. दर टनाला जाहीर केला आहे. या कारखान्यांना ऊस देणे शेतकऱ्यांना परवडेल काय ? व शेतकऱ्यांनी असा कारखान्याना ऊस द्यावा काय ? उसाच्या झोनबंदीमुळे अशा कारखान्यांच्या कार्यक्षमतेतील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची पिळवणूक होत आहे. म्हणून ऊस झोनबंदीला शेतकऱ्यांचा विरोध आहे. सहकारी क्षेत्रातील धुरीणांनी याचा देखील विचार केला पाहिजे. ऊस झोन बंदी बाबत राज्य सरकारची जबाबदारी अत्यंत महत्त्वाची आहे. उसाची झोन बंदी उठविणे पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखान्यांबाबत

हानिकारक आहे, तर मराठवाड्यातील साखर कारखान्या संदर्भात उस झोन बंदी उठविणे शेतकऱ्यांच्या हिताचे आहे. उसाची झोन बंदी चालू ठेवायची असेल तर राज्य सरकारने उसाच्या उत्पादन खर्चावर आधारीत उसाचे किमान भाव ठरवून द्यावेत, त्यापेक्षा कमी भाव उसाला मिळू नयेत. हे भाव ठरविताना कारखान्याची आर्थिक कुवत, गाळप, कार्यक्षमता, साखर उतारा यांचा विचार करु नये. शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित किमान भावाची हमी मिळाल्यास झोनबंदीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही, किंवा उत्पादन खर्चावर आधारित किमान भाव राज्य सरकारला निश्चित करावयाचा नसेल तर उस झोन बंदी उठवावी.

उस उत्पादक शेतकऱ्यांची उस तोडणी कामगाराकडून विशेषत: मराठवाड्यात पिळवणूक होत आहे. शेतकऱ्यांच्या उसाला तोड आल्यानंतर उस तोडणी कामगार शेतकऱ्यांकडे जळणाची मागणी करतात. जो पर्यंत उस तोड चालू असते तो पर्यंत सकाळ संध्याकाळचे जेवण शेतकऱ्यांना उस तोडणी कामगारांना द्यावेच लागते. उसाची तोडणी सुरू करताना शेतकरी परंपरेनुसार उसाच्या फडाची पुजा करतात. त्या पुजेसाठी दक्षिणा म्हणून दर एकरी ५०० रु. ते ३००० रु. पर्यंत उस तोडणी कामगारांकडून मागणी होते. फड पुजा दक्षिणेचे दर उसाच्या उत्पादनावर अवलंबून असतात. अतिरिक्त उस उत्पादन काळात हे दर मानमानेल तसे असतात. ही दक्षिणा ठेवली तरच उसाची तोड सुरु होते अन्यथा नाही. उस तोड काळात ट्रक ड्राईव्हर व क्लिनरला दोन वेळा जेवण शेतकऱ्याने द्यावे लागतेच. अतिरिक्त ऊस उत्पादन काळात ट्रक ड्रायव्हरला ऊसाच्या प्रत्येक ट्रकला १०० ते २०० रु. द्यावेच लागतात, धन्यथा ती ट्रक पुन्हा ऊस नेण्यासाठी त्या शेतकऱ्याच्या फडावर येत नाही. उस कारखान्याला जावा म्हणून शेतकरी मुकाट्याने ही मागणी मान्य करतात. तसेच ऊस तोडणी संपल्या नंतर ऊस तोड कामगारांना गोड किंवा खारे जेवण द्यावे लागते. हे जेवण ऊस तोडणी कामगार शेतकऱ्यांकडून ऊस तोड सुरु करण्यापूर्वी कबूल करून घेतात. त्याचा खर्च अंदाजे २००० रु. चे आसपास येतो. हे जेवण दिलेच पाहिजे असे काही नाही, जेवणाची रोख रक्कम दिली तरी कामगारांना चालते. हे प्रकार गेल्या वर्षाच्या गळीत हंगामात अंबाजोगाई व तेरणा सहकारी साखर कारखान्यांच्या परिसरात अगदी राजरोसपणे घडले आहेत. साखर उद्योगात अशा अपप्रवृत्ती बोकाळल्या असून उस उत्पादक शेतकऱ्यांची राजरोसपणे नाडणूक व अडवणूक केली जात आहे, याकडे ना साखर कारखानदारांचे लक्ष आहे ना सरकारचे लक्ष आहे. परिणामी उस उत्पादक शेतकरी उसाच्या चिपाडाप्रमाणे पिळून निघत आहे. या अपप्रवृत्ती रोखण्यासाठी सरकारने पावले उचलावीत. उस तोडणी कामगारांसाठी कायदेशीर नियमावली व आचार संहिता तयार करुन तिची कडक अंमलबजावणी करावी.

अशा रितीने आज महाराष्ट्रातील साखर कारखानदारी समोर जी वेगवेगळी आव्हाने व समस्या आहेत, त्यांचे निराकरण करुन सरकारने उस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, व शेतकऱ्यांचा असंतोष व उद्रेक थांबवावा, त्यासाठी सरकारने पुढील उपाय योजावेत.

१) सहकारी साखर कारखान्यांनी 'पोस्ड कॉर्ब' (POSD CORB) या तत्वानूसार व्यावसायिक व्यवस्थापनाचा अवलंब करावा.

२) उत्पादन खर्चावर आधारित शेतकऱ्यांना ऊसाचे भाव द्यावेत.

३) उसाची झोन बंदी न उठविता उत्पादन खर्चावर आधरीत उसाचा किमान दर ठरवावा.

४) केंद्र सरकारने साखर निर्यातीला परवानगी द्यावी.

५) केंद्र व राज्य सरकारांनी साखर कारखान्यावरील कराचे ओझे कमी करावे व विविध कपाती कमी कराव्यात.

६) भाग विकास निधी रद्द करावा.

७) उस कामगारांसाठी कायदेशीर नियमावली व आचारसंहिता तयार करावी.

८) केंद्र व राज्य सरकारने किंमत स्थिरिकरण निधी स्थापन करावा.

९) केंद्र सरकारने साखर विक्रीची कोटा पध्दती रद्द करावी व सर्व राज्यांना साखरे बाबत समान धोरण अवलंबावे.

१०) उसाला दर टनी १००० रु. भाव द्यावा.

आधार

१) India -1994

२) Indian-Economy - R. Datt & Sundhram

३) उसाच्या किमतीचा घोळ - डॉ. जुगळे व प्रा. जुगळे. प्रबोधन प्रकाशन इचलकरंजी

४) दै. लोकसत्ता - १५-१२-९५

५) दै. महाराष्ट्र टाईम्स - १५-१२-९५

६) दै. पुढारी २५-११-९५

७) दै. सकाळ - २४-११-९५, २३-११-९५

८) दै. केसरी - २९-१२-९५, २.

९) हु. किसन अहिर सहकारी साखर कारखाना लि. वार्षिक अहवाल १९९२-९३

१०) कृष्णा – एक अभ्यास १९८५-८६ ते १९९२-९३

११) YOJANA-Feb. 28,1994 Vol. 38, No. 3

१२) तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. वार्षिक अहवाल १९९३-९४

१४) इंदापूर सहकारी साखर कारखाना लि. वार्षिक अवाल १९९१-९२

१५) Souvenir - 54th Annual Congerence of Indiaan Society of Agricultural Economics - Shivaji University, Kolhapur

१६) अर्थमंथन – २७ नोव्हे. १९९५

१७) दै. लोकमत – १३-११-९५, २-११-९५

लेखक सांगली येथे प्राध्यापक आहेत.

आंतरराष्ट्रीय कृषि विकास निधी पुरस्कृत महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा प्रकल्प

● सुनील डबीर

राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने, आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी पुरस्कृत महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा प्रकल्प नांदेड, यवतमाळ, चंद्रपूर व पुणे या चार जिल्ह्यांमध्ये पथदर्शी प्रकल्प म्हणून चालविण्यात येत आहे. भारतीय स्टेट बँक, स्टेट बँक ऑफ हैदराबाद, बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ इंडिया आणि सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांच्या मार्फत या प्रकल्पाची अंमलबजावणी केली जात आहे.

देशाच्या ग्रामीण विभागांमधील गरीब लोकांना उपलब्ध करून देण्यात येणा-या वित्तीय सुविधांमध्ये वाढ करणे, त्यांना मोठ्या प्रमाणावर बँकांचे ग्राहक बनविणे आणि स्वयंसाहाय्य बचत गटांच्या स्थापनेला प्रोत्साहन देऊन बचतीवर आधारित अर्थसाहाय्य देणे, ही महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा प्रकल्पाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. तसेच, बंकांतर्फे देण्यात येणाऱ्या पतपुरवठ्याच्या सुविधांमध्ये सुधारणा करण्याशिवाय, अनौपचारिक सुविधांचा विकास करून प्रक्रियात्मक खर्चात कपात करणे आणि वसुलीच्या प्रमाणात वाढ करणे, यांचाही प्रकल्पाच्या इतर उद्दिष्टांमध्ये समावेश आहे.

आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधीतर्फे अर्थसाहाय्य मिळविण्याच्या दृष्टीने डिसेंबर ९२ मध्ये या प्रकल्पाचे मूल्यांकन करण्यात आले आणि दि.१८ मार्च ९३ला संबंधित वाटाघाटी पूर्ण करण्यात आल्या. दि. ८ एप्रिल ९३ ला झालेल्या बैठकीत निधीच्या कार्याकारी मंडळाने या प्रकल्पाला मंजुरी दिली आणि दि. १५जुलै ९३ ला या अर्थसाहाय्य करारावर संबंधितांच्या स्वाक्षऱ्या झाल्या. त्यानंतर, केंद्र सरकार आणि राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक यांच्या दरम्यान सहकार्य करारानंतर दि. ६जानेवारी ९४ पासून प्रत्यक्ष अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्यात आले.

या प्रकल्पाचा मूळ आराखडा तयार करण्यात आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधीचा सिंहाचा वाटा असून , प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाचेही मार्गदर्शन लाभले आहे. प्रकल्पाची नियोजित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेतर्फे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखालील जिल्हा प्रकल्प विकास समिती,, गटविकास अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखालील गट-स्तरीय समिती, व्यापारी बँका, महिला आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र औद्योगिक व तांत्रिक सल्लागार संस्था, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र इत्यादी सहयोगी संस्थांच्या मदतीने प्रयत्न केले जात आहेत.

या प्रकल्पाची प्रभावी अंमल-बजावणी व कालबद्ध नियमन करण्याच्या उद्देशाने, प्रकल्प सुकाणू समितीच्या सचिवालयातर्फे सविस्तर प्रकल्प अहवाल आणि अंमलबजावणी अहवालाचे विहित नमुने सर्व सहयोगी संस्थांकडे प्रारंभीच पाठविण्यात आले आणि संबंधित पदाधिकाऱ्यांना प्रशिक्षणही देण्यात आले.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या नोव्हेंबर ९४ मध्ये झालेल्या बैठकीत जिल्हा प्रकल्प सल्लागार समितीच्या केंद्रीय (कोअर) गटाची स्थापना करून दर मासिक बैठकीत प्रकल्पांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याच्या आवश्यकतेवर भर देण्यात आला. तसेच, अस्तित्वात असलेल्या स्वयंसाहाय्य बचत गटांना सहभागी करून गेऊन पतपुरवठा करणे आणि ग्रामीण विकासाच्या योजनांच्या संदर्भात गावकऱ्यांच्या सहकार्याने स्थानिक गरजांना अनुरुप अशा

योजनांची आखणी करण्याची आवश्यकता प्रतिपादित करण्यात आली. ग्रामीण विकासाच्या योजनांची आखणी करण्याच्या दृष्टीने, ग्रामविकास सभेच्या माध्यमातून उपलब्ध साधनसामुग्री, आर्थिक गरजा , उत्पादनापूर्वी व नंतर आवश्यक सेवा व सुविधांचे मूल्यांकन करण्याची ही अभिनव अनौपचारिक पद्धत आहे. औपचारिक पद्धतीने संबंधित माहिती पडताळणीही लगेच करता येते. प्रत्यक्ष गावकऱ्यांशी विचारविनिमय करून साधनसामुग्रीची उपलब्धता आणि मोसमानुसार त्यांच्या उत्पन्नात होणारे बदल व अपेक्षित खर्च लक्षात घेऊन दारिद्र्य रेषेखालील लोकांसह इतर समाजघटकांचा सहभाग असलेला आर्थिक विकास आराखडा तयार केला जातो.

महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा प्रकल्पात सहभागी होणाऱ्या बँकांचे शाखाधिकारी व क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या मदतीने सर्वसमावेशक ग्रामविकास सभा आणि ग्रामविकास समितीची स्थापना केली जाते. ग्रामविकास समिती व बँकांच्या कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमही आयोजिण्यात येतात. विकास प्रकल्पासाठी अर्थसहाय्य मिळविण्याच्या दृष्टिकोनातून स्वयं-साहाय्य बचत गटांची स्थापना व परिचालनासाठी बिगर-शासकीय संस्थांशी करार केले जातात. साधारणपणे सहा महिने किंवा अधिक काळापासून समाधानकारक कामगिरी करणाऱ्या स्वयंसहाय्य गटांच्या माध्यमातून आवश्यक ते अर्थसाहाय्य उपलब्ध करून दिले जाते. या प्रकल्पांच्या अंमलबजावणीची नियमित-पणे समीक्षा करून बँकांतर्फे लाभधारकांना प्रत्यक्ष किंवा स्वयं-साहाय्य गटांच्या मार्फत मार्गदर्शन केले जाते. प्रत्येक लाभधारकाला बँकेत खाते उघडण्यासाठी प्रोत्साहन देऊन सर्वाधिक बचत करणाऱ्या पहिल्या दोन सदस्यांच्या नावांची जिल्हा ग्रामीण समितीकडे शिफारस केली जाते. संबंधित गावाचा आर्थिक विकास आराखडा तयार करून तो तालुका व जिल्हा पातळीवर मंजुरीसाठी पाठविला जातो. तसेच, या प्रकल्पांच्या अंतर्गत पतपुरवठा मिळालेल्या लाभधारकास आवश्यकता भासल्यास राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बंकेकडे पुनर्वित्त साहाय्यासाठी आवेदनपत्रे पाठविली जातात.

महिला आर्थिक विकास महामंडळही (माविमं) स्वयंसाहाय्य बचत गटांची स्थापना व जोपासना करण्यात पुढाकार घेते. महिला महामंडळाचे कर्मचारी, सहयोगिनी, बिगर-शासकीय संस्थांचे कर्मचारी व गटप्रमुखांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजिण्यात येतात. सामाजिक जनजागृती व साक्षरतेच्या प्रसारासाठीही विविध कार्यक्रम महामंडळातर्फे आयोजित केले जातात.

महाराष्ट्र औद्योगिक व तांत्रिक सल्लागार संस्था (मिटकॉन) , या संस्थेतर्फे संबंधित विभागातील लोकांना उपयुक्त व्यवसायाविषयीची माहिती उपलब्ध करून देणे आणि ग्रामीण बाजारपेठांचा अभ्यास करून विक्रीच्या संदर्भात मार्गदर्शन करण्याचे कार्य मुख्यत्वे हाती घेतले जाते. तसेच, गटस्तरीय समितीला विक्री व्यवस्थापनाविषयी तांत्रिक माहिती पुरविली जाते व नवीन उद्योगांसाठी आवश्यक ते मार्गदर्शन केले जाते.

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रातर्फे प्रामुख्याने प्रशिक्षक व प्रवर्तकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजिण्यात येतात. बिगर-कृषी क्षेत्रातील व्यवसायांसाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या सहकार्याने उद्योजकता विकास कार्यक्रमांचेही आयोजन केले जाते.

राज्याच्या पशुसंवर्धन विभागातर्फे कृषी क्षेत्रातील लाभार्थ्यांसाठी पशु-पालन कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम आयोजिण्यात येतात. प्रकल्पाच्या भागात कृत्रिम रेतनासाठी आवश्यक नायट्रोजन द्रव उपलब्ध करून दिला जातो. आणि दत्तक घेतलेल्या प्रत्येक गावात चार भूखंडासाठी शेतक-यांना गवताचे बी व खते मोफत पुरविली जातात.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेतर्फे जिल्हा प्रकल्प सल्लागार समितीच्या सचिवालयासाठी प्रत्येकी एका कृषी अधिकाऱ्याची व समाजशास्त्रज्ञाची नियुक्ती केली जाते आणि संबंधित कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते. महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा प्रकल्पाच्या अंतर्गत शेतीला पूरक असलेल्या उद्योगांसाठी व पारंपारिक व्यवसायां-साठी लाभार्थ्यांच्या कौशल्य प्रशिक्षणा-ची व्यवस्थाही यंत्रणेतर्फे केली जाते. प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा वार्षिक आढावा घेण्यासाठी कार्यशाळा आयोजित करून त्यातील अनुभवांच्या आधारे प्रकल्प नियमन व मूल्यांकनाचे नवे निकष ठरविले जातात. लाभार्थ्यांसाठीही अशीच एक वार्षिक

कार्यशाळा आयोजिण्यात येते आणि त्यांना गरजांनुरुप मार्गदर्शन केले जाते.

राष्ट्रीय बँक व्यवस्थापन संस्थेतर्फे गटस्तरीय कार्यशाळांमध्ये अनुभवी व्यक्तींना मार्गदर्शनासाठी पाठविले जाते. तसेच, प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे नियमन, अध्ययन करून अर्धवार्षिक अहवाल सुकाणू समितीच्या सचिवालयाकडे पाठविला जातो. या प्रकल्पाच्या संदर्भात, बँकांच्या कामगिरीचा आढावा घेण्यासाठी बँकर्स इन्स्टिट्यूट फॉर रुरल डेव्हलपमेंट (बर्ड) या संस्थेतर्फे अध्ययन हाती घेतले जाते. नांदेड जिल्ह्यात असे अध्ययन जुलै ९५ मध्ये घेण्यात आले.

स्थानिक लोकांच्या सहकार्याने गावाच्या आर्थिक विकासाचा आराखडा बनविण्याच्या दृष्टीने, राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेच्या स्थानिक साहाय्यक महाव्यवस्थापकांच्या पुढाकाराने प्रत्येक सहयोगी बँकेने दत्तक घेतलेल्या गावांमध्ये असे उपक्रम राबविण्यात येत आहेत. प्रारंभी, प्रत्येक तालुक्यातील किमान एका गावाचा आर्थिक विकास आराखडा तयार करण्यात आला. त्यात पिंपळगाव व दाभड(नांदेड), बापशेटवाडी (मुखेड) , सगरोळी (बिलोली) आणि होट्टल व झरी(देगलूर) यांचा समावेश होता. नांदेड जिल्ह्यातील सुमारे वीस गावांच्या आर्थिक विकासाचा आराखडा तयार करण्यात आला असून, या उपक्रमात लोकांचे उत्स्फूर्त सहकार्य मिळत आहे. गावातील आर्थिकदृष्ट्या मागास व इतर दुर्बल घटकांना विविध व्यवसायांसाठी पतपुरवठा उपलब्ध करून देण्याचे समन्वित प्रयत्न केले जात आहेत.

सहाय्यक माहिती अधिकारी पत्रसूचना कार्यालय, नांदेड

□□

केंद्रीय राज्य वित्तीय संबंध

(पान १४ वरून)

स्वीकारले आहे. अर्थात ९ व्या वित्तआयोगाने देखील हे तत्त्व स्वीकारले होतेच. परंतु त्याबाबतीत अपेक्षित यश मिळाले नाही. म्हणून या वित्त आयोगाने घटकराज्यांची वर्गवारी करुन, करांपासून मिळणाऱ्या दरडोई उत्पन्नाचा आधार घेऊन घटकराज्यामध्ये समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. याशिवाय काही अविकसित घटकराज्यांना विशेष मदत देऊन वित्त आयोगाने घटकराज्यांत समानता आणण्याचा प्रयत्न केला आहे.

दहाव्या वित्त आयोगाने समतोल विकासाच्या दृष्टीने वास्तवतेवर आधारीत गतिमान दृष्टीकोन स्विकारला आहे. या आयोगाने साधनसंपत्तीचे वाटप कसे करावे एवढेच सुचविले नसून साधन संपत्तीचा वापर करतांना विकासाचा मूलभूत ढाचा (रचना) कसा असावा हे देखील सुचविले आहे. गेल्या चार वर्षात आपण विचार केला तर आपल्याला असे दिसून येते कि, भारतीय संघराज्यात केंद्र आणि घटकराज्यांमध्ये असमानता दिसून येते. ती दूर करण्यासाठी या आयोगाने अनुकुल शिफारशी केल्या आहेत असे म्हणायला हरकत नाही.

भारतातील केंद्र-राज्य वित्तीय संबंध सुधारण्यासाठी, केंद्र आणि घटक राज्यांतील असमानता दूर करण्यासाठी प्रत्येक वित्त आयोगाने वेळोवेळी शिफारशी सुचविल्या होत्या. परंतु त्या स्विकारल्या न गेल्यामुळे विभागीय असमतोल वाढतच गेला आणि केंद्र-राज्य वित्तीय संबंध विकोपाला जाऊन पोहोचले. तसेच योजनांतर्गत कार्यक्रमातील विविध प्रकल्पांमध्ये फक्त घटकराज्यांचाच अधिकाधिक सहभाग आणि केंद्राच्या सहभागाचा अभाव, आणि साधनसंपत्तीचा विनियोग उत्पादकतेसाठी होतो किंवा नाही हे पाहणाऱ्या यंत्रणेचा अभाव यामुळे या समस्या अधिकच बिकट होत गेल्या. म्हणून या उणिवा दूर करुन वित्त आयोग आणि योजना आयोग या दोहोत वास्तववादी दृष्टीकोनातून अधिक सुसंवाद असला आणि व्यावहारिक दृष्टीकोनातून या आयोगाच्या शिफारशी सरकारने स्विकारून अंतिमत: त्यांची अंमलबजावणी केंद्र आणि घटकराज्यांनी योग्यरित्या केली तर केंद्र-राज्य वित्तीय संबंध सुधारण्या-बाबत आतापर्यंत जी उपेक्षा होत होती ती होणार नाही अशी अपेक्षा बाळगायला हरकत नाही.

श्री. देसाई जळगांव येथे प्राध्यापक आहेत.

□□

वर्गणीत सवलत

विद्यार्थी, शिक्षक, ग्रंथालये यांना 'योजना'च्या वार्षिक वर्गणीत १०% सूट आहे. त्यासाठी संस्थेकडून त्यांनी प्रमाणपत्र आणले पाहिजे. वर्गणी मनीऑर्डर, पोस्टल ऑर्डर, बँक ड्राफ्टने पुढील पत्त्यावर पाठवावी.

'योजना' मासिक कार्यालय

३८, युसुफ बिल्डिंग, ४था मजला, वीर नरिमन मार्ग हुतात्मा चौक,

मुंबई - ४०० ००१.

६९वे मराठी साहित्य संमेलन – एक आढावा

● ग. ल. कर्वे

दसरा- दिवाळीच्या सुमारास मोसमी वारे वहाण्याचे थांबतात तेव्हा अखिल महाराष्ट्रात, विशेषत: मुंबई-पुणे, सोलापूर, औरंगाबाद, नागपूर या शहरपट्टीत मराठी साहित्य संमेलनाचे वारे वाहू लगतात. संमेलन साधारणपणे जानेवारी-फेब्रुवारीत भरवावयाचे असते परंतु आपली लोकशाही असल्याने साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांची निवड लोकशाही मार्गाने होते. प्रत्येक वेळी बिनविरोध निवड होतेच असे नाही. त्यामुळे दिवाळीनंतर या अध्यक्षपदाच्या निवडणूकीसाठी चुरस सुरू होते. रुसवे-फुगवे, थोड्या उखाळ्या पाखाळ्या वर्तमानपत्रांतून रकाने भरवून जातात. यावर्षी मात्र तसे काही न होता अध्यक्षांची निवड बिनविरोध झाली. प्रसिद्ध कवयित्री श्रीमती शांता शेळके यांचे नाव एकमताने मंजूर झाले.

संमेलन श्रीक्षेत्र आळंदी इथे १ फेब्रुवारी ९६ ते ४ फेब्रुवारी ९६ पर्यंत चार दिवस भरले. ज्ञानेश्वरांच्या वास्तव्याने आणि संजीवन समाधीने पावन झालेली आळंदी, त्यात ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधीला सातशे वर्षे झाल्याचा योग, शांताबाईंसारख्या लोकप्रिय कवयित्री अध्यक्ष, लता मंगेशकर दस्तुरखुद उद्घाटन करणार, ज्ञानेश्वरांच्या प्रेमापोटी सर्व मंगेशकर कुटुंब भक्तीसंगीताचा कार्यक्रम करणार, भीमसेन जोशींची अभंगवाणी आळंदीक्षेत्र पुण्यापासून फक्त २५ किलोमीटरवर, मुंबईपासूनही फार लांब नाही त्यामुळे संमेलनाला खूप गर्दी होईल अशी अटकळ संमेलनाचे सर्वेसर्वा प्रा. विश्वनाथ कराड यांना होतीच. परंतु त्यांच्या अपेक्षेबाहेर गर्दी संमेलनाला लोटली होती. हा अर्थात् कराडांचा दोष नाही, साहित्य संमेलनाला चार दिवस हजारोंच्या संख्येने आलेली ही गर्दी कुणाची होती? कशासाठी इतकी गैरसोय सोसून चार दिवस हे लोक राहिले? ह्या प्रश्नांची उत्तरे इतकी सोपी नाहीत. एक निश्चित की या वर्षीच्या अलोट गर्दीत ज्ञानेश्वर माऊलींवर भक्ती करणारे वारकरी संप्रदायी भक्तीमार्गी लोक बऱ्याच संख्येने होते.

संपूर्ण संमेलनावर भक्तीमार्गाची गडद छाया होती इतकी की विज्ञाननिष्ठा आणि भक्तीमार्ग या परिसंवादात भाग घेणारे शास्त्रज्ञही वारकरी संप्रदायी वाटत होते.

दरवर्षी साहित्य संमेलन ग्रंथ दिंडीने सुरू होते. यावर्षी आळंदीला या दिंड्यांचे आयोजन ओढूनताणून असल्यासारखे वाटत नव्हते. आळंदीच्या आसपासच्या अनेक गावांतील शाळकरी मुलांनी वाजतगाजत, ताल मृदंगांच्या साथीने लेझीम खेळीत, पहिल्या दिवशी सकाळी दिंड्या संमेलनाच्या मंडपात आणल्या. वारकरी संप्रदायाचे पोषाख केलेली मुले, नऊवारी साड्या नेसलेल्या मुली दिंड्या पताका घेऊन नाचम-नाचत मंडपात आल्या आणि वातावरण भक्तीमय होऊन गेले. ज्ञानेश्वरांच्या जीवनावरील काही चित्ररथ मिरवणूकीत होते. परंतु सकाळी हजारो प्रतिनिधींच्या आगमनाच्या गोंधळात ह्या दिंड्यांचे पाहिजे तसे स्वागत झाले नाही.

पहिल्या दिवशी ठीक चार वाजता उद्घाटनाचा सोहळा दूरदर्शनवर तत्काळ (लाईव्ह) दाखवला जाणार होता. त्यामुळे कार्यक्रम वेळेवर सुरू करण्यासाठी संयोजकांची फार धावपळ होत होती. व्यासपीठावर उपस्थित रहाणारे काही साहित्यिक गर्दीने वेळेवर व्यासपिठावर येऊ शकत नव्हते बहुधा. अतिप्रचंड सभा मंडपही चारच्या आधीच ओसंडून वहात होता. चाळीस पन्नास हजारांच्यावर रसिकश्रोते हजर होते. त्यामुळे थोडा गोंधळ होणे अपरिहार्य होते.

संमेलनाचा पहिला दिवसच नव्हे तर सर्व संमेलनभर लता मंगेशकर यांच्या उद्घाटनाच्या भाषणाने व्यापून टाकले होते. लता मंगेशकरांसारखी गायिका जिचा साहित्याशी काही संबंध नाही ती काय भाषण करणार, तिचे तिथे प्रयोजनच काय या काही साहित्य रसिकांच्या मनातल्या प्रश्नांना लतादिदींनी चांगले उत्तर दिले. मी जरी गायिका असले तरी मला अगदी बालपणापासून अनेक साहित्यिकांचा विशेषत: नाटककारांचा सहवास लाभला

आहे. वडिलांच्या नाटक कंपनीमुळे अनेक नाटककार अगदी जवळून पहात आले. अनेक नाटकांतून मी कामे केलेली आहेत असे सांगून मी इथे अगदीच उपरी नाही हे त्यांनी सुचवले. एवढ्या मोठ्या समुदायासमोर भाषण करण्याचा त्यांचा बहुधा पहिलाच प्रसंग असावा. भाषण वाचून दाखवत असल्या तरी त्या अगदी नाट्यपूर्ण पद्धतीने वाचीत होत्या, मध्येच थांबून श्रोत्यांची दाद घेत होत्या. काव्यांची व्याख्याही त्यांनी सांगितली. 'जे शब्द, जी भावना सुरतालात आपोआप गुंफली जाते ते काव्य' असे त्या म्हणाल्या. ज्ञानेश्वरांवर लता मंगेशकरांची विशेष भक्ती का आहे हे त्यांच्याकडून कळले. समाजाने वाळीत टाकल्यावर आईवडिलांच्या निधनानंतर निवृत्ति ज्ञानदेव - सोपान - मुक्ताबाई या भावंडांचे हाल झाले तरीही समाजाबद्दल कडवटपणा न बाळगता ज्ञानेश्वरांनी लिहिलेले 'मोगरा फुलला, मोगरा फुलला' हे काव्य गाताना माझ्या पाठीशी आमचे बाबाच उभे आहेत आणि आम्हा भावंडांकडे बघत आहेत असा भास होतो हे त्यांनी सांगितल्यावर हजारोंचा श्रोतृसमुदाय गहिवरून गेला. ज्ञानेश्वरांनी आपल्या आईवडिलांचे नाव 'बाप रखुमा देवी वरु' प्रत्येक अभंगात किती खुबीने गुंफले आहे हे सांगताना लतादीदी भावनाविवश झाल्या होत्या. साहित्याने संगीत व कला याकडे आकसाने पाहू नये असे त्या कळकळीने सांगून गेल्या.

लता मंगेशकर यांच्या भाषणाने निर्माण झालेल्या भाववृत्तीनंतर संमेलनाच्या अध्यक्षा शांताबाई शेळके यांचे झालेले अध्यक्षीय भाषण जरा बेचव वाटले. शांताबाईंनी आपल्या भाषणात अनेक मुद्यांना स्पर्श केला. आपल्या रसिकतेत श्रवणाचा भाग फार महत्त्वाचा असतो हे सांगताना त्या फार भारावून गेल्या. लहानपणी अर्थ न कळताच म्हटलेली स्तोत्रे, अभंग, ओव्या, कविता यामधून आपल्याला नादाची ओळख होते आणि तो आनंद आपली जन्मभर साथ करतो. पंडिती काव्याकडे दुर्लक्ष झाल्याची त्यामुळे खंत वाटते. एकूण पाठांतराचे महत्त्व कमी झाले आहे पण त्यामुळे रसिकतेची हानी होते. मराठीत आता चांगल्या नियतकालिकांचे दुर्भिक्ष्य आहे. ग्रंथालये फारच थोडी आहेत, इतर भाषांतील दर्जेदार वाङ्मय भाषांतरित करून हल्ली मराठीत येत नाही. भाषांतराला महत्त्व राहिले नाही. अर्थात् 'झाडांना सर्वकाळ बहराचे ऋतु भेटत नाहीत' असे सांगून आपण आशावादी असल्याचे त्या म्हणाल्या.

त्याच दिवशी संध्याकाळी सात वाजता इंद्रायणीच्या पाण्यात ज्ञानेश्वरीतील ओव्यांच्या संख्येइतके दिवे सोडण्यात आले. पण इंद्रायणीला पाणी अगदी कमी असल्याने पाणी वहात नव्हते त्यामुळे या गाजावाजा केलेल्या दीपदानाच्या कार्यक्रमाचा फज्जा उडाला. अर्थात् कल्पना चांगली होती आणि ज्ञानेश्वरीतील ओव्यांच्या संख्येशी सांगड घालून साहित्यिक टच दिला होता.

पहिल्या रात्री निमंत्रितांचे कविसंमेलन झाले. मोठा श्रोतृवर्ग लाभूनही हे निमंत्रितांचे कविसंमेलन गाजले नाही. एकूण मराठी कवितेविषयी काळजी वाटावी अशा दर्जाच्या कविता ऐकून एकविसाव्या शतकात मराठी कवितेचे काही खरं नाही असे वाटायला लागले. दुसरे नवोदितांचे कविसंमेलन ऐकूनही मराठी कविता आवर्तात सापडली असल्याचे ठळकपणे जाणवले. केशवसुत, मर्ढेकर, कुसुमाग्रज, पाडगांवकर-बापट- करंदीकर, आरती प्रभू, दया पवार यांच्या कवितांवर प्रेम करणारा जुन्या पिढीतला रसिक तर ह्या कविता ऐकून भांबावून गेला. कविता हे सामाजिक चळवळीचे व्यासपीठ एवढाच अर्थ घेतल्याने आताची मराठी कविता एकूणच फार कोरडी वाटते. त्यामानाने बालमेळाव्यात वाचल्या गेलेल्या कविता आशादायी होत्या.

कविसंमेलनाबरोबरच या चार दिवसांत अनेक परिसंवाद आयोजले गेले. एका वेळी दोन दोन परिसंवाद चालू होते त्यामुळे सर्व परिसंवादांना पूर्णवेळ हजेरी लावणे शक्य नव्हते. 'ज्ञानदेवे रचिला पाया' या परिसंवादात ज्ञानेश्वरांच्या भक्तीमार्गाचे महत्त्व सांगितले. बाळासाहेब भारदे अध्यक्षस्थानी असलेल्या या परिसंवादात राम शेवाळकर, यू. म. पठाण, किसन महाराज साखरे, दादामहाराज मनमाडकर यांनी भाग घेतला. ज्ञानेश्वर माऊलींनी भक्तीमार्गाचा पाया रचला हाच विषय प्रत्येक वक्त्याने सांगितला. पण ज्ञानेश्वरांचे साहित्यिक मूल्य काय, त्यांनी मराठी सारस्वताचा पाया रचला या गोष्टीचा फारसा कुणी उल्लेख केला नाही.

'समाज प्रबोधनाचे दृष्टीने आमचे मराठी साहित्य निकामी आहे का ?'

या परिसंवादात ग. प्र. प्रधान, गोपाळ मयेकर, दया पवार, हरी नरके, रजिया पटेल यांनी भाग घेतला. मुस्लीम परिवर्तन चळवळीची डोळस दखल मराठी साहित्याने घेतली नाही असे रजिया पटेल म्हणाल्या. आसूडासारखी लेखणी चालवणारा लेखक आजच्या काळाला हवा आहे असे प्रधानांचे म्हणणे. साहित्याने समाजप्रबोधन केलेच पाहिजे का हा मूलभूत प्रश्न जो परिसंवादाच्या विषयात अपेक्षित नव्हता. तो प्रा. मयेकर यांनी उपस्थित केला. 'कलेसाठी कला की जीवनासाठी कला' ह्या फडके-खांडेकर वादाची कुणाला आठवण होऊ नये हे आश्चर्य.

मी का लिहिते/लिहितो' या परिसंवादात अविनाश धर्माधिकारी, विद्याधर गोखले, रा. रं. बोराडे, भालचंद्र आव्हाड, नागनाथ कोनापल्ले, रवींद्र भद इत्यादींनी विचार मांडले. नुकतेच प्रशासकीय सेवेचा राजिनामा दिलेल्या 'अस्वस्थ दशकाची डायरी' मुळे प्रकाशझोतात आलेल्या अविनाश धर्माधिकारींच्या विचाराबद्दल श्रोत्यांत जास्त कुतुहल होते. लिहिण्याची एक जबरदस्त उर्मी लेखकास लेखनाल प्रवृत्त करते असे ते म्हणाले.

'प्रसार माध्यमांच्या जाळ्यात प्रेक्षक' हा परिसंवाद महाराष्ट्र टाइम्सचे संपादक कुमार केतकर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. त्यांनी मुळी या परिसंवादाच्या विषयाला हरकत घेतली. दूरदर्शन माध्यमाचे महत्त्व जाणून घ्यायला पाहिजे असे ते म्हणाले बाकीचे वक्ते विश्वास मेहेंदळे, स्मिता तळवलकर, सुरेश द्वादशीवार, अवधूत हर्डीकर, शशिकांत नार्वेकर, उत्तम कांबळे हे सर्व दूरदर्शनचा विळखा पडला आहे ह्या मताचे होते. दूरदर्शनवर मराठीपण नसते, साहित्यकृतीवर आधारित कार्यक्रम नसतात असा आक्षेप घेतला गेला. एकंदरीत परिसंवादातून काहीच साध्य झाले नाही.

'आजचे विनोदी साहित्य खरोखरच विनोदी असते कां' या विषयाच्या परिसंवादात मूळ विषयावर फार चर्चा झालीच नाही. अशोक जैन यांनी सूत्रसंचालन केले. द. मा. मिरासदार, बाळ सामंत वगैरे चांगले विनोदी लेखक असूनही विनोदी किस्से सांगण्याशिवाय परिसंवादात चर्चा नव्हती. विनोदी लेखकांना प्रतिष्ठा नाही असे बाळ सामंत यांनी स्वत:च्या अनुभवावरून सांगितले. मुकुंद टाकसाळे म्हणाले, पु. ल. देशपांडे मराठी विनोदाचा पूर्णविराम नाही. अर्थात् वाचकांना हे माहित असते की विनोदी साहित्य पुढेही निर्माण होईल. पण सध्या हा स्वल्पविराम इतका कां लांबला आहे ? एकूण परिसंवाद विषयाला धरून नव्हता.

'विज्ञान निष्ठा आणि महाराष्ट्रातील भक्ती संप्रदाय' ह्या परिसंवादात वसंत गोवारीकर अध्यक्ष होते. जयंत नारळीकर येणार म्हणून लिहिले होते पण ते आले नाहीत. पण वारकरी भक्ती संप्रदायामुळे महाराष्ट्रात विज्ञाननिष्ठा आली नाही हे खरे कां या विषयावर कुणीही उलटसुलट चर्चा केली नाही प्रत्येक वक्ता भक्तीमार्गाचेच गोडवे गात होता. मोठमोठ्या कॉलेजमधून विज्ञान विषय शिकवणाऱ्या प्राध्यापकांकडून ही अपेक्षा नव्हती.

ज्ञानदेवांच्या आळंदीत संमेलन असल्याने वारकरी संप्रदायाला मानणारे भाविक आणि वाचक यांची यावर्षी संमेलनाला गर्दी जास्त असल्यामुळे की काय आणि त्याच कारणासाठी फारसे दलित साहित्यप्रेमी आळंदीला न आल्याने यावर्षी दलित साहित्यावर चर्चा फारश्या गाजल्या नाहीत. 'दलित साहित्याच्या नव्या दिशा' या परिसंवादात बाळकृष्ण कवठेकर यांनी दलित साहित्याने पंचवीस वर्षाच्या वाटचालीनंतर आता आत्मचिकित्सा करावी असे म्हटले. ज्योती लांजेवार म्हणाल्या की दलित साहित्य आता एकसूरी झाले आहे, ते आवर्तनात सापडले आहे. संजय पवार इत्यादी दलित साहित्यिक या मुद्याशी सहमत नव्हते, उलट दलित साहित्य हीच मराठी साहित्याची नवी दिशा आहे असे त्यांचे म्हणणे होते.

आळंदी साहित्य संमेलनात भीमसेन जोशींची अभंगवाणी असणे ओघाने आलेच. सबकुछ पु. ल. असलेल्या गुळाच्या गणपतीतील 'इंद्रायणी काठी देवाची आळंदी, लागली समाधी ज्ञानेशाची' हा अभंग भीमसेन जोशींनी तन्मय होऊन म्हटला. मंगेशकर बंधू भगिनींचा 'अमृताचा धनु' हा ज्ञानेश्वरांच्या विराण्यांवर आधारित कार्यक्रम मंगेशकर कुटुंबाच्या ज्ञानेश्वरांवरील भक्तीमुळे गाजला नसता तर नवलच. विशेष म्हणजे एरवी या कार्यक्रमात भाग न घेणाऱ्या लतादीदींनी आपण होऊन शेवटी पसायदान म्हटले हा संपूर्ण कार्यक्रमाचा कळस होता.

शेवटच्या समारोपाच्या दिवशी एक आगळा कार्यक्रम आयोजला होता. भारतातील सर्व भाषांतील हयात ज्ञानपीठ पारितोषिक विजेत्या साहित्यिकांचा सत्कार करण्यात आला. शिवराय कारंथ, नरेश मेहता, सीतकांत महापात्र, सुभाष मुखोपाध्याय हे ज्ञानपीठ पारितोषिक विजेते साहित्यिक हजर होते. मराठीचे ज्ञानपीठ-विजेते वि. वा. शिरवाडकर मात्र प्रकृती अस्वास्थामुळे उपस्थित राहू शकले नाहीत.

साधारणपणे ४०-५० लाख रुपये खर्चून 'संपन्न' (की साजऱ्या) झालेल्या ह्या साहित्य संमेलनाचे प्रयोजन काय, दरवर्षी असे खर्चिक साहित्य संमेलन भरवलेच पाहिजे का, संमेलनाचे फलित काय, त्यामुळे मराठी वाचकांचा, साहित्यिकांचा, पर्यायाने मराठी साहित्याचा किती फायदा होतो याचे गणित मांडणे कठीणच आहे. तशी चर्चा त्यानंतर काही दिवस होत रहाते. दरवर्षी ऐवजी दोन-तीन वर्षांनी संमेलन भरवले तर काय होईल याची साधकबाधक चर्चा व्हायला हरकत नाही. म्हणजे ऑलिम्पिक, एशियाड, आंतरराष्ट्रीय फूटबॉल, क्रिकेट सामन्यांसारखे दर चार वर्षांनी नको तरी दोन वर्षांनी नको तरी दोन वर्षांनी एकदा भरवावे. अर्थात् अशी चर्चा पावसाळ्यापर्यंत होऊ शकते. नंतर पुन्हा संमेलनाचे वेध लागतील.

□□

पुस्तक परिक्षण

मूल्याधिष्ठीत राजकारणाचे प्रवर्तक

भारतसेवक गोपाळ कृष्ण गोखले

● ज. श. आपटे

१९व्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात राजकीय, सामाजिक, साहित्यिक क्षेत्रात महत्त्वाची व मोलाची कामगिरी बजावणारे अनेक थोर स्त्री-पुरुष जन्मास आले. यामध्ये गोपाळकृष्ण गोखले ह्यांच्या नावास अनन्य साधारण महत्त्व आहे. अवघ्या ४९ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी आपल्या कर्तृत्वाने, कामगिरीने, महाराष्ट्राच्या व भारताच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रात आपला ठसा कायमचा उमटविला आहे.

जन्म, बालपण

९ मे १८६६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळुण तालुक्यातील कोतलुक ह्या छोट्या खेड्यात झाला. पेशव्यांच्या राज्यात गोखले ह्यांच्या एका पूर्वजाला 'रास्ते' (नेक, प्रामाणिक) असा किताब लाभला होता. गोखले ह्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूरजवळील कागल येथे पूर्ण झाले. १८८१ साली ते मॅट्रीक परीक्षा उत्तीर्ण होऊन कोल्हापूरच्या कॉलेजात पुढील शिक्षणासाठी दाखल झाले. दोनच वर्षापूर्वी १८७९ साली त्यांचे पितृछत्र हरपले. गोखले ह्यांचे मोठे बंधु गोविंदरावांनी त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली १८८५ डिसेंबरमध्ये ते पदवीधर झाले आणि पुण्यात न्यू इंग्लीश शाळेत सहशिक्षक म्हणून काम करू लागले. गोपाळरावांची राहणी अत्यंत साधी होती. स्वयंपाक स्वत: करीत व रस्त्यावरील दिव्याखाली अभ्यास करीत देशासाठी उत्कटतेने काही विधायक करावे हे गोखले ह्यांना फार लहान वयात — १९व्या वर्षी वाटू लागले.

राष्ट्रसभेच्या व्यासपिठावरून पहिले भाषण

वयाच्या अवघ्या ३९व्या वर्षी भारतसवेक गोखले बनारसच्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले. राष्ट्र सभेच्या कामाशी त्यांचा संबंध नोव्हेंबर १८८८ पासून होता. २७ डिसेंबर १८८९ रोजी सभेच्या व्यासपिठावरून त्यांनी आपले पहिले भाषण केले. गर्व्हनर जनरलच्या लेजिस्लेटीव्ह कौन्सिलची सुधारणा करण्यासंबंधीच्या ठरावाला टिळकांनी पाठविलेल्या उपसूचनेला पाठिंबा दर्शविणारे भाषण गोखले ह्यांनी केले. त्यांच्या भाषणाने सभागृह प्रभावित झाले. पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या अहवालावर सरकारने केलेल्या कारवाईवर टिका गोखल्यांनी आपल्या भाषणात केली त्यांच्या सर्वच भाषणत सखोल अभ्यास, माहिती व आंकडेवारी, आपल्या विवेचनास, प्रतिपादनास बळ आणणारी मांडणारी, छाप टाकणारी, विचारास प्रवृत्त करणारी त्यांची शैली असे.

न्यायमूर्ती रानडे ह्यांचे शिष्यत्व

सार्वजनिक सभेच्या कामात गोखले ह्यांना न्यायमूर्ती रानडे ह्यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, उत्तेजन, साहाय्य लाभले. भारत सेवक गोखले ह्यांच्या सार्वजनिक, राजकीय जीवनाच्या जडणघडणीत न्यायमूर्तींचा वाटा फार मोठा आहे. १९ मार्च १८९७ रोजी वेडरबर्न ह्यांना लिहिलेल्या पत्रात रानडे म्हणतात, 'प्रोफेसर गोखले हे होतकरू तरुण गृहस्थ आहेत. पुण्याच्या सार्वजनिक सभेचे सन्माननीय चिटणीस म्हणून त्यांनी फार उपयुक्त कामगिरी केली. . . गेली दहा वर्षे ते माझ्या मार्गदर्शनाखाली काम करीत आहेत. उच्च दर्जाच्या बुद्धिमत्तेची त्यांना देणगी लाभलेली असून ते मोठे गुणी आहेत. कमालीचे अभ्यासू आहेत... वक्तृत्वाची कला उत्तम साध्य केलेली जी अगदी थोडी मंडळी पश्चिम भारतात आहेत, त्यांच्यापैकी ते एक आहेत... ज्या मुद्यांवर ते साक्ष देणार आहेत, त्या मुद्यांची त्यांची तयारी उत्तम झाली आहे. . . ते चांगले वक्ते आहेत. तेव्हा तेथील प्रमुख शहरांमध्ये त्यांच्या व्याख्यानांचे कार्यक्रम व्हावेत अशी माझी फार इच्छा आहे. हिंदुस्थानपुढील सर्वसाधारण प्रश्नांवर ते अशा सभांमधून अधिक मोकळेपणे बोलू शकतील.' वेल्बी कमिशनसमोर गोखले ह्यांची साक्ष १२ व १३ एप्रिल १८९७ ह्या दोन दिवशी होऊन उलटतपासणी झाली. वेडरबर्न ह्यांनी गोखले ह्यांच्या कामगिरीचे कौतुक करताना म्हटले, 'तुमची कामगिरी उत्तम झालीय. आपल्या बाजूने जे साक्षीपुरावे

भारत सेवक समाजाचे उद्दिष्ट व मार्ग

"ब्रिटिशांचा हिंदुस्थानशी संबंध दैवी योजनेमुळेच हिंदुस्थानच्या हितासाठी आला असे आद्य तत्त्व भारतसेवक समाजाच्या सभासदांनी मानले पाहिजे." ह्या समाजाचे ध्येय 'साम्राज्यांतर्गत स्वराज्य' व देशबांधवांची उन्नती हे आहे. ते सनदशीर मार्गांनी गाठण्यासाठी कार्यकर्ते तयार करण्याची जबाबदारी 'समाजा'ने घ्यावयाची असून त्यांनी खालील मार्ग स्वीकारावयाचे.

१. स्वोदारहरणाने व उपदेशाने जनतेत उत्कट देशप्रिती जागृत करणे.

२. राजकीय ज्ञानप्रसार करून चळवळी आरंभणे.

३. जाती-जातीत सहकार्य व सलोखा वाढविणे.

४. शिक्षणसंवर्धनास मदत करणे. (विशेषतः शास्त्रीय व औद्योगिक शिक्षण)

५. औद्योगिक चळवळीत प्रोत्साहन देणे.

६. मागासलेल्यांची उन्नती करणे.

'भारतसेवक' गोखले यांनी 'सेवकां'साठी (सर्व्हंटस्) निर्बंध घातले होते व आग्रह होता. निदान पांच वर्षे समाजात अभ्यास केल्यानंतरच कोणालाही 'समाजा'चे सभासद होता येत होते. म्हणून 'सर्व्हंटस् हे 'स्टुडंटस्' असतात. अध्ययन अभ्यासाचा आग्रह विशेष महत्त्वाचा आहे. 'सेवकां'ची मते, दृष्टीकोन, त्यांना अनुयायांचे पाठबळ व पाठिंबा नसला तरी ग्राह्य विचार करण्याजोगी ठरतात. निःस्वार्थी, कष्टाळू, मेहनती, सेवाभावी व संघभावनेने देशकार्यास वाहून घेणाऱ्या मंडळींचा समाज स्थापून त्यांच्या अध्ययन-अभ्यासाची सोय लावली व स्वतःच्या उदहारणांचा आदर्श त्यांचेपुढे ठेवला. ही कामगिरी श्रेष्ठ दर्जाची आहे.

झाले, त्यात तुमची साक्ष सर्वात सरस ठरेल्ल.' वेल्बी कमिशनपुढील साक्षीमुळे गोखले यांची राजकीय प्रतिष्ठा वाढली, स्थान उंचावले. न्यायमूर्ती रानडे म्हणाले, 'आमचे उदयोन्मुख आशास्थान गोखले आहेत. ह्या साक्षीला त्यांच्या जीवनात महत्त्वाचे स्थान आहे.'

भारत सेवक समाजा'ची स्थापना

नामदार गोखले यांनी १२ जून १९०५ रोजी देशासाठी निस्वार्थ भावनेने, प्रामाणिकपणे, समर्पित वृत्तीने काम करण्याच्या संस्थेची भारतसेवक समाजाची स्थापना केली. त्या दिवशी प्रातःकाली उगवत्या सूर्याच्या साक्षीने त्यांनी स्वतः 'सप्त प्रतिज्ञा' घेतली आणि गो. कृ. देवधर, अ. वि. पटवर्धन आणि एन. ए. द्रवीड ह्या आपट्यातील सहकाऱ्यांनी शपथा देवविल्या. हे तीनही सहकारी आधीपासून गोखले ह्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत होते. भारतसेवक गोखले ह्यांचा भर केवळ संस्था काढण्यावर नव्हता. अध्ययन, निरीक्षण, देशवासियांबरोबर प्रत्यक्ष संपर्क व काम, चिकाटी, निस्वार्थ ह्याद्वारे कार्यकर्त्यांची, सेवकांची गुणवत्ता वाढविणे, कस व पात्रता उंचावणे ह्यावर कटाक्ष होता.

कर्तृत्वसंपन्न जीवनाचा आलेख

भारतसेवक गोखले जगले अवघी ४९ वर्षे. पण ह्या जीवनात अनेक पदे स्वीकारत, कामगिरी बजावली. २० व्या वर्षी महाविद्यालयात अध्यापक, २२ व्या वर्षी 'सुधारक'चे संपादक, २३ व्या वर्षी 'सार्वजनिक सभे'चे चिटणीस व सभेच्या ख्यातकीर्त त्रैमासिक नियतकालिकाचे संपादक, मुंबई प्रांतिक अधिवेशनाचे चिटणीस २४ व्या वर्षी, डेक्कन एज्यूकेशन सोयायटीचे चिटणीस, २६ व्या वर्षी, हिंदी राष्ट्रीय सभेचे (काँग्रेस) चिटणीस २९ व्या वर्षी, मुंबई विधान परिषद व केंद्रीय कायदेमंडळाचे सदस्य अनुक्रमे ३४ व ३६ व्या वर्षी, बेल्वी मिशनसमोर साक्षी. ३० व्या वर्षी सी. आय. ई. सन्मानाचे मानकरी. ३८ व्या वर्षी भारतसवेक समाजाचे संस्थापक व काँग्रसेचे अध्यक्ष. ३९ व्या वर्षी रॉयल कमिशनचे सभासद. ४६ व्या वर्षी .

१९०३ पासूनच गोखले ह्यांच्या मनात ह्यासंबंधी विचार, चिंतन चालू होते. एसिल १९०३ मध्ये धारवाड येथील सामाजिक परिषदेत अस्पृश्यतेच्या रुढीविरुद्ध मोहिम चालविण्याची आवश्यकता प्रतिपादन करताना त्यांनी श्रोत्यांना एक प्रश्न उपस्थित करताना पुढील उद्‌गार काढले, "दरवर्षी विद्यापिठांमधून शेकड्यांनी पदवीधर बाहेर पडतात. यांच्यापैकी, पांच टक्के, चार टक्के, तीन टक्के, दोन टक्के, मी म्हणतो अगदी एक टक्कादेखील तरूण हीन गणल्या गेलेल्या जातींचे उन्नयन करण्याच्या पवित्र कार्यासाठी जीवन अपर्ण करू शकणार नाहीत का ?. . . आपल्या सुशिक्षित तरूण मंडळींनी त्यागाची व देशकार्यास समर्पण करून घेण्याची वृत्ती प्रकट करावी, ही या क्षणाला देशाची अत्यंत निकडीची गरज आहे.'

राजकारणाचे अध्यात्मिकरण व्हावे असे भारतसेवक गोखले ह्यांना तीव्रतेने वाटे. राजकारणात त्यांचे विचार नेमस्त दृष्टीकोनाचे होते. गांधींजी गोखले ह्यांना आंपले गुरू मानत. गोखले सर्वार्थाने राजकीय नेते होते. पण राजकारणाकडे सत्ता संपादनाचा मार्ग किंवा वैयक्तिक वापराचा स्वार्थ साधण्याचे एक साधन म्हणून त्यांनी कधी पाहिले नाही. त्यांच्या राजकारणाला ध्येयवादाचे, अध्यात्मिकतेचे, समर्पित भावनेचे अधिक्य होते. सहनिष्ठा, सेवाभाव, निःस्वार्थ देशाभिमान ही मुल्ये त्यांनी नेहमीच उच्च मानली. त्यासंबंधी त्यांनी कधीही तडजोड केली नाही. राजकीय पारतंत्र्य, सामाजिक व आर्थिक मागासलेपण या तीनही संकटांना त्यांना दूर करावायचे होते. भारताच्या राजकीय इतिहासातील मूल्याधिष्ठित राजकारणाचे ते प्रवर्तक होते. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

श्री. आपटे माजी संचालक फॅमिली प्लॅनिंग
असोसिएशन ऑफ इंडिया ब्रँच मॅनेजमेंट

शाटूश शाल वापरू नका

तिबेटी काळवीट भारतात ज्याला चिरू या नावाने ओळखले जाते तो सुंदर वन्यप्राणी नामशेष होण्याच्या मार्गावर आहे म्हणून वन्यप्राणी संरक्षण कायद्यानुसार ह्या सुंदर काळवीटाची हत्या करण्यास मनाई आहे. हा प्राणी नामशेष होण्याचे कारण म्हणजे त्याची मऊ, उत्तम प्रकारची लोकर. या लोकरीपासून पश्मिनाशालीपेक्षाही महाग असणाऱ्या शाटूश शाली विणल्या जात. ही लोकर या काळवीटाला मारल्यानंतरच मिळते, जिवंतपणी मिळत नाही. म्हणून हा प्राणी नामशेष व्हायला लागला तर नवल नाही.

प्रदूषण मंत्रालयाने सर्व जनतेला विनंती केली आहे की त्यांनी अशा शाटूश शाली विकत घेऊ नये. या प्राण्याच्या लोकरीपासून बनवलेल्या शाली किंवा दुसऱ्या कोणत्याही वस्तू विकायला ठेवलेल्या आढळल्यास जनतेने जवळच्या वन्यजीवन अधिकाऱ्यांच्या निदर्शनास ही गोष्ट आणावी किंवा जवळच्या पोलीस स्टेशनला वर्दी द्यावी.

नामशेष होणाऱ्या वन्यप्राण्यांपासून बनवलेल्या कुठल्याही वस्तू, वन्य प्राण्याच्या शरीराचे कुठलेही अवयव यांचा व्यापार करणाऱ्याकडून तो माल जप्त केला जाईल व अशा व्यापाऱ्यांना वन्यप्राणी संरक्षण कायद्याखाली ७ वर्षाची शिक्षा आणि ५००० रुपये दंड होईल.

Yojana Marathi (Monthly) February 1996 Regd No. M. H. By South-200

पुस्तकां विना घर म्हणजे
खिडक्यां विना खोली!

पुस्तके आपल्याला
ज्ञानाच्या आणि अनुभवाच्या
विशाल जगात घेऊन जातील.

पुस्तके विकत घ्या
पुस्तके वाचत रहा.

शाश्वत जीवनमूल्ये विकसित करणारी पुस्तके
आम्ही
अल्प किंमतीत प्रकाशित करतो.

: विक्री विभाग :
पब्लिकेशन डिव्हीजन
कॉमर्स हाऊस, करीगमॉय रोड,
वलॅर्ड पीयर, मुंबई - ४०० ०३८.

प्रकाशक : **संचालक, प्रकाशन विभाग,** माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार,
पतियाळा हाऊस, नवी दिल्ली. छपाई : रचना मुद्रण, दादर, मुंबई-४०० ०१४. दूरध्वनी : ४१२ ४४ १०.
प्रकाशन स्थळ : ३८, युसुफ बिल्डिंग, ४ था मजला, वीर नरिमन मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई - ४०० ००१.